

# श्री साईलीला

ऑगस्ट

रु. ५० पै

१९६

स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे.

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६३१



# श्रीसाईवाक्सुधा

गुरुची आज्ञा, मग ती कोणत्याही प्रकारची असो; ती पालन करणें हेंच शिष्याचें पवित्र कर्तव्य. तेंच त्याला भूषण आहे. खरें शिष्यपण त्यांतच आहे. त्या आज्ञा पालनाच्या पुढें परिणाम काय होईल, याचा शिष्यानें विचार करण्याची मुळींच जरुरी नाहीं. त्या आज्ञापालनामुळें आपण सुखी होऊं कीं दुःखी होऊं याचा विचार शिष्यानें करावयाचा नसतो. विचार करण्याचा भार आपण गुरुवर सोपवावयाचा. गुरुनें अमुक गोष्ट करायला सांगितली असतां त्याच्या युक्तायुक्ततेचा विचार मनांतही येऊं नये तीच खरी गुरुभक्ति होय.

—श्रीसाईसच्चरित्

---

# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४[illegible] वें ] ऑगस्ट १९६५ [ अंक ५ वा

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६३२६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

आपलें मन अत्यंत चंचल आहे हें कांहीं नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं. चंचल मनाला, सैरावैरा भटकणाऱ्या मनाला आवरणें महाकठीण आहे हें तर खरेंच; परंतु तें आवरण्याचा उपाय कोणता ?

मनाचा ओढा विजयवासनेकडे, दुसऱ्याची वस्तु अपहार करण्याकडे किंवा दुसऱ्याचें वाईट चिंतण्याकडे असतो. चांगल्यापेक्षां वाईटाकडेच मनाचा ओढा अधीक. रागाचा पगडा तर आपल्यावर नेहमींच असतो. अहंकार तर विचारूच नका. अशा एक ना दोन किती गोष्टी सांगाव्या ?

मग या फेऱ्यांतून बाहेर पडायचें कसें ? यांतून आपला बचाव कसा करायचा ? साईबाबांनीं यावर रामबाण उपाय सांगून ठेविला आहे. त्यांनीं सांगितलें आहे कीं, 'काम तरी मद्विषयींच कामावें । कोप आल्या मजवरीच कोपावें । अभिमान दुराग्रह समर्पावें । भक्तीं व्हावे मत्पदीं ॥ काम क्रोध अभिमान । वृत्ति जंव उठती कडकडून । मी एक लक्ष्य लक्षून । मजवरी निक्षून सोडाव्या ॥

काम, क्रोध आणि अभिमान हे त्यांतल्यात्यांत आमचे महान् शत्रू आहेत. पदोपदीं त्यांच्या लाटा आमच्या अंतःकरणांत उचंबळत असतात. त्यांना थंड करण्याचा मार्ग बाबांनीं दाखवून दिलेला आहे. ते जे उचंबळून येणारे दुष्ट विकार, त्या सर्वांचा तुम्ही माझ्यावर मारा करा. हा मारा कसा करायचा ?

ज्या ज्यावेळीं कामाची क्रोधाची किंवा अहंकाराची बाधा होईल त्या त्या वेळीं बाबांचें स्मरण करावयाचे. सहाजिकच, त्यामुळें त्या विकाराच्या मार्गानें तुमचे पुढें पाऊल पडणार नाहीं. जो स्वैर वागतो त्याला काय ? तो वहातच जाणार आणि शेवटीं खडकावर आदळून त्याचा कुठें तरी कपाळमोक्ष होणार ! तो टाळण्याचा राजमार्ग म्हणजे बाबांचे स्मरण.

मनाला वाटलें पाहिजे कीं, नाहीं; मी कामाच्या रागाच्या किंवा अहंकाराच्या आहारी बिलकूल जाणार नाहीं ! बाबानीं माझ्या वागण्यावर सक्त पहारा ठेविला आहे. मी कामाच्या, रागाच्या किंवा अहंकाराच्या आहारी गेलों तर तें त्यांना आवडणार नाहीं. तें मला करावयाचें नाहीं.

परंतु त्यासाठीं आपली बाबावर, त्यांच्या कृपादृष्टीवर अढळ व संपूर्ण श्रद्धा पाहिजे. बाबा माझें सर्वस्व आहेत, बाबा हे माझें रक्षण करणारे व माझ्या बऱ्यासाठीं झटणारे आहेत. मी सर्वस्वी त्यांचा आहे. ते करूणानिधान आहेत. मी माझा भरिभार त्यांच्यावर सोपविला आहे. कर्ता करविता, तारता, मारता तोच आहे. मी स्वतःला त्यांच्या हवाली करून चुकलों आहे.

माझ्या मनांत ज्या भावलहरी उत्पन्न होतील ज्या ज्या लाटा उसळतील त्या सर्व मी त्यांना अर्पण करणार ही भावना आपल्या अंतःकरणांत दृढ झाली पाहिजे.

ही फार महत्वाची साधना आहे. ज्याच्या वागण्याला सुमार नाहीं त्याची गोष्टच वेगळी. मनुष्याच्या वागण्याला सुमार पाहिजे. ज्याला शाश्वत सुख मिळवायचें आहे त्यानें स्वतःवर बंधन लादून घेतलेंच पाहिजे, अनिर्बंध वागणें म्हणजे कधीं तरी कोणत्या ना कोणत्या खड्यांत पडणें व त्यांत स्वतःला गाडून घेणें !

त्यासाठीं तुमचा जन्म आहे का ? मानव जन्म घेऊन तुम्हांला कांहीं ना कांहीं साधायचें आहें ना ? मग तें अनिर्बंध वागण्यानें कधींही साध्य होणार नाहीं याची मनाशीं खूणगांठ बांधून ठेवा.

ही साधना आहे म्हणून सांगितलें. साधनेचें फळ का चुटकीसरशीं मिळत असतें ? ती अविरत व अखंड चालू ठेवायची असते. मनाला चांगलें व इष्ट वळण लावणें, मनोनिग्रह करणें हें आपणास साधायचें आहे. तें साधना आणि तीही निर्धार-पूर्वक केल्याशिवाय कांहीं वळणार नाहीं.

कोणत्याही बाबतींत यश एकदम हातीं येत नाहीं. आस्ते, आस्ते परंतु निर्धार-पूर्वक प्रयत्न करीत राहिलें पाहिजे. प्रयत्नांतीं परमेश्वर !

बाबांचे उठतां बसतांचें स्मरण ही एक दिव्य औषधीच आहे. मनांत कांहीं दुष्ट भावना किंवा दुष्ट विचार आला असतां तात्काळ बाबांची आठवण व्हावी. हें रुचेल कां बाबांना ? असा प्रश्न मनाला विचारावा. जें बाबांना रुचणार नाहीं तें कदापि करायचे नाहीं. बाबा हें आपलें बंधन; बाबा ही आपणास दुष्ट विचारापासून मागें खेचणारी वेसण ! ती आपण अडकवून घेतली पाहिजे.

आणि मग ? मग काय तुमचा मार्ग मोकळा होत जातो. बाबा सांगतात कीं, ‘ऐसी संवयी लागतां मना । क्षीण होतो विषयकल्पना । आवडी उपजे गुरुभजना । शुद्धज्ञाना अंकुर ये ॥

आपले अंतःकरण अशुद्ध विचारांनी भरलेलें आहे. ती घाण तेथून काढून टाकायची आहे. ती एकदम नाहीं काढून टाकतां येणार. त्यासाठीं वर सांगितल्या-प्रमाणें साधनेची कांस धरली पाहिजे.

ही साधना माझ्याकडून कशी होणार ? या विचारानें कोणीही यत्किंचीतही निराश होण्याचे कारण नाहीं. जो मनांत आणील, जो निर्धार करील त्याला सहज साध्य असा हा मार्ग आहे. त्या मार्गानें जाण्याची प्रेरणा बाबांच्या कृपेनें तुम्हां आम्हांला याच जन्मीं होवो हीच प्रार्थना.

—संपादक

# विश्व खजिना

( लेखक : द. शं. ठिपणीस )

मानवी लीवन अपूर्ण आहे. निसर्गानें मानवाला अपूर्णच तयार केला आहे. परंतु त्याचबरोबर त्यानें आपणा स्वतःस पूर्ण करावें, जीवनांत ज्या ज्या उणीवा असतील त्या त्या भरून काढाव्यात, जीवनांतील अडथळ्यांचे महासागर ओलांडून जावें, आयुष्यांतील संकटांचें पर्वत पार करावेत अशीहि योजना निसर्गानें करून ठेवली आहे. इतर प्राण्यांत नाहीं अशा प्रकारची, बुद्धि निसर्गानें मानवाला दिली आहे. ती नसती तर मानव हा विश्वांतील पालापाचोळा झाला असता. लहानसहान प्राण्यांनीं खुशाल पायदळीं तुडवावा ! पण बुद्धि आहे म्हणून आज तो चंद्रावर झप घेऊं लागला आहे. आदित्यनारायण असा जो महा प्रखर, तेजस्वी व सामर्थ्यवान सूर्य त्यालाहि तो उद्यां आपल्या मुठींत ठेवील. शारीरिकदृष्ट्या मानव हा दुर्बल व शक्तिहीन आहे, वाघ सिंहापुढें तो मुंगीसारखा आहे. पांच पन्नास ढेंकूण बिछान्यांत शिरले तर त्याला हैराण करून वेडापिसा करून टाकतात. पांच पंचवसि डांस त्याच्या शरिराचा खोका करायला पुरें आहेत. घोड्याची दौड, हरणाचा वेग, बैल रेड्याची ताकद त्याच्यापाशीं नाहीं. चिमण्या व कावळ्यासारख्यानींहि हवेंत उड्डाण करावें पण बिचाऱ्या मानवाला तीही ताकद नाहीं. परंतु बुद्धिच्या साधनाचा उपयोग करून माणसानें आपल्या ह्या उणीवा, आपली कमतरता वा आपली 'कमजोरी भरून काढली आहे. बुद्धीनें त्याच्या हातांत शस्त्रास्त्रें व हत्यारें दिल्यामुळें शारिरीकदृष्ट्या मानव कितीहि कमजोर असला तरी तो आज एका दमांत वाघ–सिंहाला लोळवूं शकतो. बुद्धीचा वापर करून त्यानें घोडा, बैल आदि प्राण्यांना स्वतःचें गुलाम बनवून त्यांच्याकरवीं ओझी वाहून घेतो, वाहनें ओढवून घेतो व योग्य पौष्टीक खाद्याचा पुरवठा करवून घेतो. मोटारी, आगगाड्या यांच्या दौडीपुढें हरणाची दौड म्हणजे कःपदार्थ त्यानें करून टाकली आहे. उंचउंच उड्डाणें करणाऱ्या व सरकन् झप घेणाऱ्या घारीची घमेंड त्यानें पार जिरवून टाकली आहे. ज्या अग्नीला व वायूला घाबरून पूर्वी मानव दुरून नमस्कार करीत असे व त्यांची करुणा भाकीत असे त्या अग्नीला व वायूला मानवानें आज आपल्या कार्यास जुंपलें असून त्यांच्याकडून आपल्याला पाहिजे ती सुखें तो मिळवीत आहे. वाफेला कोंडून महा सामर्थ्यशाली कार्य तो करवून घेत आहे. आकाशांतील विजेकडे एकेकाळीं आवासून अचंबाब्याने पहाणाऱ्या व घाबरून जाणाऱ्या मानवानें आज त्याच विजेला घरांदारांतून खेळवून तिच्या आवाढव्य शक्तीचा आपल्या सुखासाठीं उपकरून घेतला आहे. सर्वांत ताकदवान् सामर्थ्यशाली व म्हणेन ती पूर्व करणारा असा जर कोणता प्राणी असेल तर तो मानव होय. पूर्वीच्या गोष्टींतील ताकदवान् राक्षस

आजच्या मानवापुढें लहान बालकासारखे आहेत. सर्व सृष्टीला पायाशीं लोळण घालण्यास लावण्याचा मानवाचा प्रयत्न चालू आहे. हें सर्व त्यानें बुद्धीच्या जोरावर कमावले आहे व आणखी काय काय पराक्रम करील याचें भविष्य होरारत्नें वा भुषणेंही करूं शकणार नाहीं. पण—पण ज्या बुद्धीनें त्याला हे सर्व दिलें तीच बुद्धी मध्येंच त्याला जाणीव देते कीं भल्या माणसा हें सगळं केलंस तरी तूं अपूर्ण आहेस. तुझ्या हाताला अद्याप पूर्ण कुठें लागलंय असं वाटतं तोच तें अपूर्ण आहे असं तुझं तुलाच वाटूं लागतं. न्यूटनच्या शोधांत जग डुलत आहे तोंच नारळीकरांनीं नाहीं कां चिमटा घेतला. अहो हें सर्व नव्हे. आहे तें निराळेंच. येथून चंद्र दिसतोय म्हणून धावतोस तिकडे. तेथें गेलास कीं, दुसरें कांहीं दिसेल कीं चाललास पुढें. आणखी पुढे. पुढे-पुढें. अंत नाहीं, शोधाचें तुला आतां जणूं व्यसनच लागलें आहे. तूं थांबूं शकतच नाहीं ब्रेकरहीत उतरणींवरून पुढें पुढें जाण्याखेरीज गत्यंतर नाहीं. मृगजळामागें लागलेल्या माणसासारखी झालीय तुझी स्थिती. जसजसा धावतोस तसतशा पाण्याच्या लहरी पुढें पुढेंच दिसतात. शेवटीं दमशील थकशील व बसशील आणि हातीं ? कांहींच नाहीं. ऐहिक सुखासाठीं तुझी सारी धडपड करायची तर खुशाल कर. कांहीं हरकत नाहीं. प्रत्येकानें आपलें जीवन सुखी व आनंदी अवश्य करावें. ईश्वर स्वतां आनंद आहे. मुद्दाम दुःखीकष्टी राहणें हा ईश्वरी गुन्हा आहे. यामुळें मानवा, आपलें जीवन जेवढें सुखी करतां येईल तेवढें खुशाल कर. विश्वांतील जेवढा आनंद व मजा लुटतां येईल तेवढी खुशाल लूट.

पण या सुखाच्या शोधांत तूं कांहीं विसरला आहेस. तुझें आहे तुजपाशीं परि तूं जागा चुकलासी. तूं आपल्या शरीराचाच विचार करीत बसला आहेस. तुला मन आहे, अंतःकरण आहे, भावना आहेत इकडे तुझें लक्षच नाहीं. अग्नि, वायु, वीज हीं तूं मुठींत ठेवलीस पण मन कुठें तुला मुठींत ठेवतां येतंय ? वाफ वीज यांना कोंडतोस खरं. पण कोंड पाहूं तुझ्या मनाला. शक्य आहे कां हें तुला ? तुला तुझ्या मनावर ताबा चालवतां येत नाहीं आणि विश्वावर ताबा चालवण्याच्या गोष्टी बोलतोस. गणितश्रेणीनें तूं सुखें वाढवतो आहेस खरा पण त्याच श्रेणीनें दुःखेहि वाढवतो आहेस. वैद्यकीय शोधामुळें आरोग्याच्या बाबतींत मानव जितका सुखी झाला आहे तितकाच नाना तऱ्हेच्या नवीन नवीन रोगांच्या प्रादुर्भावामुळें तो हैराण होत आहे. नवीन नवीन औषधोपचार व नवीन नवीन रोग यांची जणुं शर्यतच लागली आहे. दोघांचा आलेख काढल्यास त्यांची शिखरें एकाच समपातळींत येतील. विमानें, आगगाड्या, वीज आदींच्या शोधामुळें सुख दारीं आलें असलें तरी मृत्युही नाना वाटांनीं दारीं येऊन उभा आहे. विज्ञानांतील संशोधनांमुळें जीवनांतला खराखुरा अंतःकरणाला हळुवारपणें आल्हाद देणारा आनंद लुप्त होऊन त्याऐवजीं ठराविक ठशाचा बेगडी आनंद जीवनांत येईल कीं काय अशी चिन्हें दिसत आहेत. नैसर्गिक निरझराचें थंडगार पाणी व साचलेल्या तलावांतील यंत्रानें थंडगार केलेलें पाणी यांत तफावत राहाणारच. शुभ्र शीतल चांदण्यांत, निसर्गाच्या सान्निध्यांत व मंदवायूच्या लहरींत बैलगाडींतून गप्पा

मारीत मारीत डुलक्या काढीत व अधूनमधून शेंगा, चणे वा तत्सम कांहीं चघळीत केलेल्या प्रवासांत मिळणारा आनंद व सात्विक सुख, आगगाडींतील वा विमानांतील गाद्यांवर लोळतांलोळतां केलेल्या प्रवासांत मिळणें कठीण आहे. पहिल्यांत निसर्गाच्या सानिध्यांत मिळणारें स्वातंत्र्य सुख आहे तर दुसऱ्यांत स्थानबद्धास मिळणारें सुख आहे. मानवी बुद्धी ही पूर्णाला जाणण्यास पूर्ण असमर्थ असल्यामुळें तिच्या साहाय्यानें मिळविलेली सुखें कधींच पूर्ण म्हणजे दुखःविरहीत असूं शकणार नाहींत. या अपूर्णपणामुळें केवळ बुद्धीच्या साह्यानें मानव कधींहि विश्वाचा राजा होऊं शकणार नाहीं. संत हेंच खरें ब्रह्मांडाचें राजे आहेत बादशाहा आहेत. कारण तें पूर्ण आहेत. या विश्वाचे ते मालक आहेत. विश्वाचा खजिना त्यांच्या मालकीचा आहे. तूंहि मालक होऊं शकशील. पण तूं एकाक्ष आहेस. विज्ञानाच्या डोळ्यानें तेवढें पहातोस पण अध्यात्माचा डोळा उघततच नाहींस. मग हा सर्व खजिना तुला दिसणार कसा, व तो तुला मिळणार कसा ? ईश्वर कांहीं तुला नाहीं म्हणत नाहीं. काय पाहिजे तें या विश्वांतील उचल व सुखी हो. इच्छाच आहे तशी. चंद्रावर गेलास म्हणून त्याला वाईट वाटणार नाहीं. आनंदच वाटेल. बाबा म्हणत असत, " माझा भांडार भरपूर आहे. माझें सरकार न्या न्या वदे. ज्याला जें पाहिजे तें मी देतो. " काय पाहिजे ते मात्र तूं नीट ठरव. नाहींतर भटजीला देव प्रसन्न झाला व म्हणाला काय पाहिजे तें माग. तेव्हां त्यानें मागितलें काय ? तर पानाला लावायला चुना. असला दरिद्रीपणा केलास तर खटपटी लटपटी करून शेवटीं दुःखी तो दुखीच राहून जाशील.

हें विश्व, अखिल ब्रह्मांड परमेश्वराचें भांडार आहे. मानवाला आल्हाद देणारी सुंदर सुकुमार सुवासिक फुलें आहेत. तसीच जंगली रानवट फूलेंहि आहेत. मानवी शरीराला पुष्टी देणारी सुंदर रसाळ व स्वादिष्ट फळें आहेत तशीच जीव घेणारीं विषारी बोंडेंहि आहेत. किलबिल करून आपल्या गायनानें रिझविणारें रंगीबेरंगी पक्षी आहेत तसेंच व्रणावर टोंच मारणारे व जीवनाचा फडशा पाडणारेही पक्षी आहेत. थंडगार स्वच्छ गोडे पाणी आहे त्याच जोडीला खारें पाणीही आहे. जीवन फुलविणारे प्रेम, वात्सल्य, दया, माया, बंधुभाव आहेत तर जीवन जाळणारे हेवेदावे, द्वेष मत्सरटी आहेत, अमृत आहे विषहीं आहे. गोड आहे कडू आहे. चांगलेंहि आहे वाईटही आहे. सुगंध आहे व दुर्गंध आहे. द्वंद समासाखेरीज अस्तित्वच नाहीं. वैचित्र्यानें व विरोधानें हें विश्वभांडार भरपूर भरलेलें आहे. पाहिजे तें मानवानें खुशाल घ्यावें. त्याबद्दल मालकाला पैही देण्याची जरूरी नाहीं. मोफत मुक्तद्वार कसलीहि आडकांठीं नाहीं कीं बंधन नाहीं. धर्म आडवा येणार नाही. कीं जातपात वा प्रांतीयता आडकाठी करणार नाहीं. लिंगभेदाचें बंधन नाहीं कीं वयाची अट नाहीं. शंकराचार्यादि ब्रह्मवृंदांनीं हा खजिना लुटला तसाच तुकारामसारख्या कुणब्यानें ही तो हस्तगत केला. शिंपी नामदेव, दासी, जनाबाई, गोरा कुंभार, सांवता माळी, नरहरी सोनार, सेना

न्हावी, चोखा महार, गणिका कान्होपात्रा, दादू पिंजारी, मीराबाई आदि नाना जातीच्या स्त्री पुरुषांनीं तसेंच ज्ञानेश्वर रामतीर्थासारख्या तरुणांनीं हा विश्व खजिना हस्तगत केला. येशु, महमंद, नानक यांनीही तो लुटला. जात, धर्म गणगोत्र कशाचाही पत्ता नसलेल्या साईबाबानींही तो खिशांत टाकला. जर्मन, रशिया, अमेरिकन, फ्रेंच आदी शास्त्रज्ञांनींही त्यांना योग्य वाटलें तें या खजिन्यांतून हस्तगत केलें. अशा प्रकारें कोणीही कांहींही देवाच्या या देवघरांतून उचलून न्यावें, वापरावें व आपलें जीवन समृद्ध करावें. मानवा, खरेंच रे परमेश्वर किती दयाळू नि उदार आहे! त्यानें आपलें सर्वस्व तुम्हा आम्हांला देऊन टाकले आहे. आपण नवकोट नारायण नव्हे कुबेर आहोंत. तिजोरी भरलेली आहे. उघडायची, पाहिजे तें घ्यायचें व आनंदी आनंद करायचा मजा आहे, पण-देवानें एक मोठा पण ठेवून दिला आहे. तो जिंकला पाहिजे. तिजोरी उघडायची कशी? किल्ली कशी हस्तगत करायची? या भांडारांतील घ्यायचें काय? टाकायचें काय? कशानें जीवन समृद्ध, टवटवीत व सुखी होईल? हें सर्व माहीत असेल तर. मोठीच तर आहे. ती ओलांडली पाहिजेच. नाहीतर विषालाच अमृत समजून त्याचें घुटकें घेत बसायचें आपण. हा पण जिंकायला, ही तर पार करायला ज्यांनीं स्ववः डा पण जिंकला आहे, जे स्वतः तरीपार झालें आहेत असें बाबासारखे कुबेर सद्गुरुच आपणांस मार्गदर्शन करूं शकतील. तिजोरीची किल्ली तेंच देऊं शकतील, भांडार कसें उपसावें, काय घ्यावें काय टाकावें. अमृत कोणतें विष कोणते, हें सर्व तेंच सांगतील. पण-पुन्हा पण आला. कोणी किल्ली घ्यायलाच तयार नाहीं. मार्गदर्शक मार्ग दाखवायला तयार आहेत. पण त्यांचें कोणी मानायला तयार नाहीं. बाबा प्रेमानें तक्रार करतात कीं, उतून चालला आहे खजिना। एकही कोणी गाड्या आणीना। खणा म्हणता कोणीहि खणीना। असें कां व्हावें?

मानव सुखासाठीं हपापलेला आहे. पूर्ण सुखी व्हावें असें प्रत्येकास वाटतें. पण त्यासाठीं प्रयत्न करणारे कष्ट करणारे हरीचे लाल थोडेच. शास्त्रज्ञ अपार कष्ट करीत आहेत म्हणून त्यांच्या हातीं विश्व भांडारांतील निरनिराळ्या चीजा लागत आहेत. जे शास्त्रज्ञ कीं, ज्यांनीं अमाप कष्ट सोसून वेळीं जिवाचा धोका पत्करून केवळ जगाच्या सुखासाठीं विश्वांतील कांहीं संपत्ती हस्तगत केली व ज्यांच्या जिवावर आज जग मजा मारतय्, सुखोपभोग घेतय ते शास्त्रज्ञ एकपरी विज्ञानांतील संत व महात्मेच होत. संतपण हें सर्वव्यापी आहे. धर्मांत आहे शास्त्रांत आहे, व राजकारणांत आहे. गांधी, नेहरू हे संतच होते. फरक एवढाच कीं शास्त्रज्ञ हे लोकांच्या ऐहिक सुखासाठीं झटत असतात तर बाबासारखे संत जगाच्या चिरकालीन सुखासाठीं व कल्याणासाठीं झटत असतात. विज्ञानामुळें माणसाला घरबसल्या विनाश्रमं सुखसोयी मिळतात तर अध्यात्मांत कष्ट व श्रमाशिवाय सुख हाती लागत नाहीं. आपण पडलों आळशी व ऐदी. म्हणून तर नेहरूंना आराम हराम है असें सांगण्याची पाळी आली. श्रम नकोत. कष्ट नकोत. आयतें पाहिजे. आय-

त्याची आम्हांस संवय लागली आहे व व्यापारवृद्धीसाठीं ती अधिकाधिक वाढविण्यांत येत आहे. चटण्या, लोणची कीं जी करण्यास विशेष श्रम वा पैसा लागत नाहीं तींहि आम्हांस आयतीं पाहिजेत. Ready made कडे ढुंकून न पहाण्याचें जर लोकांनीं ठरविलें तर व्यापाराला केवढा हादरा बसेल हें क्षणभर लक्षांत घेतलें तर या आयतोबाची व्याप्ति किती आहे हें लक्षांत येईल. आयत्यावर कोयता चालण्याची ही कृत्ति औद्योगिक क्षेत्रांत लाभदायक असली तरी अध्यात्मिक क्षेत्रांत ती व्यक्तीचें जीवन मारणारी असल्यामुळें कोणीहि खरा संत झाला तरी आयत्यावर कोयत्याला त्याचा पूर्ण विरोध असतो. शारिरिक सुखाची आम्हांस चटक भारी. जिभेला चमचमीत लागेल तें खावें, प्यावें, मऊमऊ गाद्यांवर लोळावें, रोज नव्या नव्या फॅशन्स शिकून कॅपड्यालत्त्याची आराधना करावी हा आमचा सोस. ऐषआराम पाहिजे. विज्ञान हें सर्व पुरवूं शकते; कारण ऐहिक सुखाचा पुरवठा करणें हेंच त्याचें कार्य आहे. जविनाला यांहि गोष्टीची जरूरी आहे हें निर्विवाद. परंतु त्याला मर्यादा आहे. माणसाला मन वगैरे कांहीं अंतर्गत गोष्टी आहेत त्यांची ही सोय व वाढ इकडे लक्ष दिले पाहिजे. याची खिजगणती अगदीं परवांपर्यंत शास्त्रज्ञांना नव्हती. परंतु अलिकडे मात्र आईन्स्टाईनपासून शास्त्रज्ञांना आपल्या कार्यांत कांहीं तरी खटकते आहे, चुकचुकतें आहे असा भास व्हायला लागला आहे. सर्वसाधारण जनता फारशी विचारी नसल्यामुळें स्वस्त व आयत्या सुखाच्या मागें लागलेली असते. यामुळें बाबासारखे संत जेव्हां सांगतात कीं विश्वाचा खजिना शोधा, उकरा वापरा, जें मिळेल तें मोफत घेऊन जा व चिरकाल सुखाचा आनंद लुटा तेव्हां ही गोष्ट मानणारे श्रम व कष्ट करणारे अगदींच थोडे. म्हणून बाबा म्हणतात—

खणा म्हणतां कोणीहि खणीना । प्रयत्न कोणा करवेना ॥

या सर्वांचा असा अर्थ नव्हे कीं विज्ञान हें कमी दर्जाचें व मानवाला निरुपयोगी आहे. उलट विज्ञानाची मानवी जीवनाच्या सुखासाठीं जरूरी आहे. विज्ञांनातील संशोधनामुळें माणसाचें श्रम हलके होतात व वेळेची बचत होते. या बचतीचा उपयोग एखाद्या उच्चतर गोष्टीची उपासना करण्यांत न खर्चिल्यामुळें आमचीं मनें फुलत नाहींत, अंतःकरणें विशाल होत नाहींत यामुळें जीवनांतील खऱ्या आनंदाला आम्ही वंचित होतो. विज्ञानानें मिळणारें सुख हें पूर्ण सुख नसते. कारण त्या सुखापाठीं दुःखहि चिकटलेलें असतें. निर्भेळ सुख विज्ञान कदापिहि देऊं शकणार नाहीं. एकीकडे जीवनाच्या वाढीसाठीं व सुखासाठीं विज्ञान कार्य करीत असतां दुसरीकडे त्याच्या विनाशाचीहि तयारी करीत आहे. विज्ञानामुळें आज जीवन जितकें सुखी झालें आहे तितकेंच ते धोक्याचेहि झालें आहे. विज्ञान ज्याच्या हातांत आहे त्या मानवाचें अंतरंग जितकें सुसंकृत आहे तितकेंच तें रानटीहि आहे. याकडे दुर्लक्ष केल्यास तें वेळीं विज्ञानाचा विषारी वापर करून मानवी जीवनाचा केव्हां विनाश करील याचा नेम नाहीं. यामुळें

मानवी मन सुधारल्याखेरीज टांगत्या तलवारीसारखें असलेलें विज्ञान खऱ्या सुखाच्या कारणीं येणार नाहीं. मन सुधारावयाचें म्हणजे त्याच्याशीं निगडित असलेल्या अनेक अंतर्गत गोष्टीहि सुधारल्या पाहिजेत. याच ठिकाणीं अध्यात्माची उपयुक्तता आहे.

मानव हा कळप करून राहणारा प्राणी आहे. तो एकटा दुकटा राहूं शकत नाहीं. यामुळें समाज निर्माण झाला. समाजाच्या वळणाला धरूनच त्याला वळावें लागते. त्याला घरदार आहे. कुटुंब आहे. नातीगोती आहेत. यामुळें सामाजिक, कौटुंबिक व इतर भावना त्याच्या ठिकाणीं निर्माण झालेल्या असतात. माणूस कांहीं केवळ बुद्धीवर जगत नाहीं. भावनांनीं त्याचें जीवन फुलविलें जातें. जीवनांतला आनंद वस्तू देऊं शकत नाहीं. तिच्या मागें असलेली भावना आनंद निर्माण करतें. कुत्र्याला हाडुक मिळालें कीं त्याचा आत्माराम गारीगार होतो. पण सिंह अशा टाकलेल्या हाडकाकडे ढुंकूनही पहाणार नाहीं. स्वपराक्रमानें मिळविलेल्यांत त्याला आनंद वाटतो. घाटावरील माणसाला चटणी कांदा भाकरींत आनंद वाटतो तर एखादा कोकणी भात व माशाच्या आमटीवर खुष होतो. लहान बालकाला साखरेच्या फक्या मारण्यांत ब्रह्मानंद वाटतो. तुम्ही आम्ही आज तसेंच केलें तर तो बालपणीचा आनंद आपणांस मिळेल काय ? उलट एखाद्या बालकाला असें करतांना पाहिलें तर आपण त्याला प्रतिबंध करूं, कारण त्यांतील धोके आपण जाणत असतो. माणसाची मानसिक व अंतर्गत पातळी जसजशी उंचावेल तसतसें कशांत चांगले व कशांत वाईट हें त्याला अधिकाधिक कळूं लागते व त्यामुळें आनंद देणाऱ्या गोष्टींत बदल होत राहतो व जीवनांतील धोके कमी कमी होस जातात. ही पातळी उंचावण्यास अध्यात्मिक साधना पाहिजे. यायोगें मानवी मनाची पातळी उंचावून मानवतेचा उदय होईल. असें झालें तर मग विज्ञानाचा उपयोग मानवाला ऐहिक सुख देण्याकडे व जीवनाचें भार हलके करण्याकडे करतां येईल. पंडित नेहरूंनीं एका ठिकाणीं म्हटलें आहे, " विज्ञान, तंत्रशास्त्र आणि अणुबाँमच्या या युगांत अत्यंत झपाट्यानें बदल घडून येत असून आपल्या लोकांना चारित्र्यसंपन्न करणें हें आजहि अत्यंन महत्त्वाचें आहे. आणि शिस्त, सामाजिक संघटना, सहकार्य आणि आचरण याबाबतींत उच्च दर्जा निर्माण करणें आवश्यक आहे." (लोकसत्ता २३-५-६५) याचा मतितार्थ हाच कीं केवळ विज्ञानानें सर्व कांहीं मागावयाचें नाहीं. त्याच्या जोडीला मानवता पाहिजे. विज्ञान मानवता देऊं शकणार नाहीं. तें काम अध्यात्म करूं शकेल. म्हणजे केवळ पूजाअर्चा केल्यानें नव्हे तर अध्यात्माच्या तत्त्वांचा अंगिकार करून तीं आपल्या आचरणांत उतरविण्याचा प्रयत्न करीत तीं आपल्या आचरणांत उतरविण्याचा प्रयत्न करित, शमदमादी पाळींत, वात्सल्यानें शुद्ध-प्रेमानें व अंतीं आपण सर्व एकच आहोंत या दृढ भावनेनें आपलें रोजचें जीवन व्यतीत करीत राहिल्यानें विश्वांतील अमृत तेवढें हातीं येऊन निर्भेळ सुख आपण प्राप्त करून घेऊं शकूं. या कामीं योग्य तें मार्गदर्शन करण्यास साईबाबासारखे संत सदैव तयार आहेत साईबाबा म्हणतात—

माझें सरकार न्या न्या वदे । मजलाच जो तो म्हणे दे दे ।
कोणी न माझ्या बोलासी लक्ष दे । एकही सुधें ऐकेना ॥
उतून चालिला आहे खजिना । एकही कोणी गाड्या आणीना ।
खणा म्हणतां कोणीही खणीना । प्रयत्न कोणा करवेना ॥
मी म्हणे तो पैका खणावा । गाड्यांवारीं लुटून न्यावा ।
खरा माईचा पूत असावा । तेणेंच भरावा भांडार ॥ अ. ३२

" मी सांगतो परमेश्वरानें हें विश्वभांडार हा खजिना आपल्या लेकरांसाठीं खुला ठेवला आहे. परमेश्वर म्हणतो या बाळानो, या हा विश्व खजिना बघा. त्यांत काय आहे तें शोधून काढा व जें तुम्हाला पाहिजे तें खुशाल घेऊन जा. पण जो येतो तो आपला मलाच सांगतो कीं बाबा तुम्हीच द्या. धन द्या, संतति कीर्ति द्या मी म्हणतो बेव्यानों, परमेश्वर फुकट देतोय. घेऊन जा खुशाल काय पाहिजे तें. पण कोणी माझ्याबोलाकडे लक्षच देत नाहीं "

विज्ञान व अध्यात्म हें आपला ३६ नंबरचा ब्लॉक सोडून ६३ नंबरच्या ब्लॉक मध्यें राहिला आले व एकमेकांच्या हातात हात घालून त्यांची वाटचाल केली व विश्वांतील संपत्ति हुडकीत तें राहिले तर आज जग जें विज्ञानाच्या भयावह छायेत भित्र्यासारखे वावरत आहे तें चिरंजीव सुखाच्या सूर्यप्रकाशात बंधुभावानें आनंदाने नाचत बागडत राहिल. वैज्ञानिक संत व अध्यत्मिक संत यांची हात मिळवणी झाली तरच मानवता उदयास येईल.

---


## " साई भक्तांस अमूल्य संधी "

श्री साईलीला १९५८ ( त्रैमासिक ) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ ( मासिक ) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक ( विशेष अंकासह ) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, ( विशेष अंकासह ) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळे. ( एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे, ) ( दोन अंकास १५ पैसे, ) ( तीन अंकास २० पैसे, ) ( चार अंकास २५ पैसे. ) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी–किंमत टपाल खर्चासह ( स्टँप–तिकिट ) अगर मनीऑर्डरनें पाठवावी.

संपादक
**श्री साईलीला मासिक**

# गीतार्थ–सार

भगवद्गीतेचें थोडक्यांत सार समजून यावें व त्याचें पारायण करण्याची इच्छा व्हावी या हेतूनें यापूर्वी गीतेच्या आठव्या अध्यायापर्यंत सार देण्यांत आलें होतें. या अंकीं त्यापुढील कांहीं अध्यायांचें सार देण्यांत येत आहे.

अध्याय ९—नवव्या अध्यायाच्या आरंभीं कृष्ण सांगतो, " अर्जुना, आतां तुला मी जें ज्ञान सांगतों आहे, तें अगदीं रहस्य होय. तेणेंकरून तू सर्व पापांपासून मुक्त होशील. मी या सर्व जगांस आधारभूत व सर्वव्यापक असून यापांसून अलिप्त आहे. मी जगाची स्थिति, लय, अनासक्त होत्साता करतों, यामुळें हें कर्म मला बाधत नाहीं. मूढ दुर्बुद्धिजन मला मनुष्य मानून माझी अवज्ञा करतात. परंतु जे सद्बुद्धि महात्मे आहेत ते सर्व जगत्कारण मी असें जाणून, मला अनन्य चित्तानें भजतात, सतत माझी कथा गातात, आणि भक्तिपूर्वक निष्कामबुद्धीनें मला नमस्कार करितात. कितीएक मला मानून माझी आराधना करतात. किंतीएक मला मित्र मानून, नानाविध स्वरूपांनीं माझी आराधना करतात, म्हणजे मला अनेक देवता मानून माझी आराधना करतात. त्यांची ती आराधना अविधिपूर्वक होय. अतएव ते देवलोकाप्रत जाऊन पुनः जन्ममरणाचे फेऱ्यांत पडतात. मी सर्व जगदात्मा जगत्पिता, जगत्साक्षी जगदीश्वर, अनाद्यनंत, सर्व यज्ञांचा भोक्ता, अत्यंत मंगलमय, जगाचें निधान, असें मला जाणून अनन्य चित्तानें जें माझी उपासना करतात, त्यांचें संरक्षण मी करतों. मला सर्व मनुष्यें सारखींच, माझा कोणी मित्र नाहीं. किंवा कोणी शत्रु नाहीं. पण जे भक्तीनें माझी आराधना करतात, त्यांच्या सन्निधच असतो. जी मनुष्यें माझी अनन्यभावेंकरून भक्ति करतात तीं सद्बुद्धि होत. त्यांचा व्यवहारधंदा कितीहि नीच असला, तथापि त्यांस साधु असेंच समजावें. स्त्रिया असोत, वैश्य असोत, किंवा क्षुद्र असोत, माझ्या भक्तीनें ती सर्व लौकर धार्मिक होऊन अखंड शांत पद पावतात. मग जे सदाचारी, निर्मलकर्म करणारे, ब्राम्हणादि, ते माझ्या भक्तीनें मजपाशीं येतील यांत नवल काय ! इहलोकीं सर्व वस्तू अशाश्वत ऐहिक स्थिति परम दुःखकारक असें जाणून माझी सेवा कर. पत्र, पुष्प, फळ उदक जें कांहीं कोणी मला भक्तीनें देतों त्याचें मी ग्रहण करतो. यास्तव तूं जें करशील किंवा खाशील किंवा, हवन, किंवा दान, किंवा तप करशील, तें सर्व मला हवन कर. म्हणजें तुला कर्मफलाची बाधा न होतां तूं मजपाशीं येशील, माझें ठिकाणीं चित्त ठेव, माझा भक्त हो. यज्ञानें माझीं आराधना कर. आणि मला नमस्कार कर. याप्रमाणें मन अनासक्त करून तूं मत्परायण झालास, म्हणजे मजपाशीं येशील.

याप्रमाणें नवव्या अध्ययांत परमश्रेष्ठ, परमगुह्य ज्ञान सांगितलें आहे. म्हणून यास राजविद्या-राजगुह्ययोग असें नांव दिलें आहे.

अध्याय १० वा—दहाव्या अध्यायाचें आरंभीं कृष्ण अर्जुनास म्हणतो—" अर्जुना मी तुला आणखीहि बोध करतो, ऐक. कारण मी जें तुझ्या हिताकरितां सांगेन तें ऐकून तुला आनंदच होईल. मी सर्व जगाचें आदिकारण. मी केव्हां झालों हें देवांस किंवा ऋषींसहि कळत नाहीं. कारण त्या सर्वांस मीं निर्माण केलें. आधीं सप्त ऋषि आणि चार मनु माझ्या मनापासून निर्माण झाले, आणि त्यांच्यापासून पुढें ही सर्व सृष्टि झाली. मी सृष्टिस्थितिलयकर्ता आहे हें माझें स्वरूप जाणून, ज्ञानी भावेंकरून माझी भक्ति करितात आणि आपलें चित्त, प्राण मला अर्पण करितात; आणि परस्परांत मजविषयीं बोध करून माझ्या कथा सांगून, आनंद पावतात. असें प्रीतिपूर्वक जे माझी भक्ति करितात, त्यांचे अंतरीं मी प्रगट होऊन, ज्ञानदीपानें त्यांचें अज्ञान निरसन करून, कृपेनें त्यांस माझ्या प्राप्तीचा मार्ग दाखवितों. असें ऐकून अर्जुन म्हणतोः—" कृष्णा, तूं परब्रह्म, तूं परंज्योति, तूं परम मंगलरूप अनादि विश्वात्मा, असें सर्व ऋषि, नारद, असित, देवल, व्यास हे मुनिही सांगतात; आणि तूंहि तसेंच सांगतोस. हें सर्व मी सत्य मानितों. तुला देव दैत्य, कोणी जाणत नाहींत. तुझा तूंच आपलें स्वरूप जाणवतोस. जगत्-पालका, जगदीश्वरा, देवाधिदेवा, तुझ्या श्रेष्ठ विभूति कोणत्या, तें कृपा करून मला सांग. " तें ऐकून कृष्णानें त्यास " आदित्यांमध्यें मी विष्णु, रुद्रांमध्यें मी शंकर, वसूंमध्यें अग्नि मी, इत्यादि, दैत्य, गंधर्व, यक्ष, राक्षस, वसु, रुद्र, ऋषि, मुनि, भिन्न भिन्न पशु, पक्षी, मत्स्य, यांच्या जाती, सर्व वेद, शास्त्रें, छंद, बाह्यपदार्थ, मनोवृत्ति इत्यादि सर्वांत जीं जीं श्रेष्ठतत्त्वें, तीं मी "- असें सांगून, शेवटीं असें सांगितलें कीं, " ह्या मीं आपल्या मुख्य मुख्य विभूति तुला सांगितल्या. " वस्तुतः माझ्या विभूति अनंत आहेत. जें जें कांहीं ऐश्वर्ययुक्त तत्त्व आहे, तें तें सर्व माझ्याच अंशापासून झालेलें आहे. अथवा फार कशाच सांगूं, मीं हें सर्व जग एका अंशानें व्यापून राहिलों आहे. "

याप्रमाणें दहाव्या अध्यायांत ईश्वराच्या विभूतीचें वर्णन आहे. म्हणून यास **विभूतियोग** हें नांव आहे.

**अध्याय ११**—अकरावे अध्यायाचे आरंभीं अर्जुन म्हणतो-" कृष्णा, तूं कृपा करून जें आपल्या स्वरूपाचें वर्णन केलेंस, तें ऐकून माझा मोह दूर झाला. आतां जर तुझें विश्वरूप पाहण्याची माझी योग्यता आहे असें तुला वाटेल, तर तें पाहावें अशी माझी इच्छा आहे. " त्यावर कृष्ण म्हणतो. " मी विश्वरूप तुला दाखवितों, परंतु या डोळ्यांनीं तें तुला दिसणार नाहीं. म्हणून तुला दिव्य दृष्टि देतों. तिच्या योगानें तूं तें पाहा. " असें म्हणून त्यास आपलें दिव्य विश्वरूप दाखविलें. तेव्हां अर्जुनास असें दिसलें कीं, त्या रूपास अनेक मुखें व नेत्र आहेत; त्या रूपाचे ठायीं अनेक अद्भूत चमत्कार दिसताहेत; अनेक दिव्य अलंकार घातले आहेत;

अनेक आयुधें हातांत घेतलीं आहेत; दिव्य माळा घातल्या आहेत, दिव्य वस्त्रें परिधान केलीं आहेत, दिव्य सुगंधी द्रव्यें अंगास चर्चिलीं आहेत. या प्रकारें अत्यंत आश्चर्यकारक असें देवाचें स्वरूप दिसत आहे. आकाशांत सहस्र सूर्य एकदम उदयास आले, तर त्यांचें तेज जसें पडेल, तसें त्या रूपाचें तेज चोहोंकडे पडलें आहे. तेथें एकेठिकाणीं सर्व जग दिसत आहे. असें पाहून अर्जुन अत्यंत विस्मित झाला. त्याच्या आंगावर रोमांच उभे राहिले. तेव्हां तो देवास साष्टांग नमस्कार घालून हात जोडून म्हणाला;—" देवा, तुझ्या रूपाचे ठाईं ब्रह्मादि देव, सर्व ऋषि, सर्व भूतें, इत्यादि सर्व जगत् दिसत आहे. तुझा आदि, अंत, मध्य, कोठें कांहीं दिसत नाहीं. तुला अनेक बाहु, उदरें, मुखें, नेत्र, अलंकार, आयुधें दिसत आहेत. तुझें तेज सर्व दिशांकडे भरलें आहे, तेणेंकरून तुजकडे पाहावतहि नाहीं. तूं अविनाश परम पुरुष, तूं या विश्वाचें परम निधान, तूं पुराण-पुरुष, धर्मरक्षक, अनाद्यनंत प्रभु, चंद्र-सूर्य तुझे नेत्र, अग्नि तुझें मुख, असें दिसत आहे. सर्व विश्व तूं व्यापिलें आहेस. हे महापुरुषा, तुझें अद्‌भुत, उग्र रूप पाहून त्रैलोक्य भयाभीत झालें आहे. हे सर्व देव तुजपाशीं येत आहेत; कितीएक भिऊन हात जोडून तुझा स्तव करिताहेत; महर्षि आणि मुनिगण अनेक प्रकारें स्वस्तिपूर्वक तुझी स्तुति करीत आहेत; आणि वसु, रुद्र, आदित्य, साध्य, मरुत, विश्वेदेव, अश्विनीकुमार, गंधर्व, यक्ष, राक्षस, हे सर्व विस्मित होत्साते तुला पाहात आहेत. तुझें हें अनेकावयवयुक्त अद्‌भूत रूप पाहून सर्व लोक, व मीहि भयभीत झालों आहें. मी अगदीं घाबरून गेलों आहें. प्रलय काळच्या प्रज्वलित अग्नीप्रमाणें तुझीं हीं विकराळ मुखें पाहून मला दिशा दिसत नाहींशा झाल्या आहेत; आणि जीव कासाविस झाला आहे. हे देवाधिदेवा, हे जगन्निवासा, मजवर प्रसन्न हो. हे सर्व भीष्मादिक कौरव आणि इतर राजे तुझ्या भयंकर मुखांमध्यें भराभर शिरताहेत. कांहींचीं मस्तकें चुरून तुझे दांतांत अडकून राहिलीं आहेत. नद्यांचे प्रवाह जसे समुद्रास जाऊन मिळतात, किंवा पतंग प्रदीप्त अग्नीवर वेगानें जाऊन पडतात, त्याप्रमाणें ही सर्व प्रजा तुझ्या मुखांवाटें भराभर शिरत आहे. तूं सर्व विश्वाचा ग्रास करूं पाहातो आहेस, असें दिसतें. हे देवाधिदेवा, तूं उग्ररूपी कोण दैवत, हें कृपा करून मला सांग. मला तुझ्या रूपाचा बोध होत नाहीं." हें ऐकून कृष्ण म्हणतो,—" मी सर्वांतक काळ, सर्व जगाचा नाश करण्यास येथें आलों आहें. येथें या दोन्ही सैन्यांत जीं मनुष्यें आहेत, तीं सर्व तुझ्यासुद्धां नाहींशीं होतील. भीष्मद्रोणादिक सर्व वीर मीं पूर्वीच मारून टाकिले आहेत; अतएव तूं निमित्तमात्र होऊन निर्भय चित्तानें युद्धास उभा राहा; आणि शत्रूंस जिंकून यश आणि राज्यसंपत्ति संपादन कर. निश्चयेंकरून तुझा जय होईल." असें कृष्णाचें वचन ऐकून अर्जुन हात जोडून, कांपत कांपत, भीत भीत नमस्कार करून, अडखळत अडखळत, कृष्णास याप्रमाणें बोलला;—" हे भगवन्, सर्व जग तुझी कीर्ति गातें, आणि तेणेंकरून आनंद पावतें; राक्षस तुला भिऊन चोहोंकडे पळतात; आणि सर्व ऋषिगण तुला नमस्कार

करितात; हें योग्यच आहे. हे अनाद्यनंत देवा, जगन्निवासा, यांनीं तुझ्या पायां काय म्हणून न पडावें? तूं आद्यदैवत, पुराणपुरुष, तूं सर्व विश्वाचें परम निधान, तूं सर्व-विश्वात्मा. हे अनंतशक्ते, तुला चोहोंकडून मी पुनः पुनः नमस्कार करितों. तुला मित्र मानून, तुझा हा महिमा न जाणून, मी तुला, 'हे कृष्णा, हे यादवा, हे सख्या!' असें उद्धट भाषण चुकीनें किंवा स्नेहानें बोललों असेन; तें सर्व मला क्षमा कर. एकांतीं किंवा तुझ्या समक्ष, जेवतांना, किंवा कोणच्याही इतर वेळीं, जें कांहीं थट्टेनें बोललों असेन, तें सर्व कृपाळू होऊन क्षमा कर. तूं सर्व जगत्पिता; तूं सर्व जगद्गुरु; तुजप्रमाणें या जगांत कोणीहि नाहीं; तुझ्या सामर्थ्यास उपमा नाहीं; यास्तव तुला साष्टांगनमस्कार घालून मी तुझी क्षमा मागतो. पिता पुत्रास, किंवा मित्र मित्रास क्षमा करितो, त्याप्रमाणें कृपाळू होऊन क्षमा कर. तुझें अत्यंत अद्‌भुत रूप पाहून मी भयानें अगदीं व्याकुळ झालों आहें. अतएव पुनः आपलें पूर्वीचें शंख-चक्र-गदायुक्त चतुर्भुज रूप मला दाखीव." तें ऐकून कृष्ण म्हणतो;— "अर्जुना, मीं तुला कृपा करून हें विश्वरूप दाखविलें हें मनुष्यलोकीं पूर्वीं कधींही कोणी पाहिलें नाहीं, आणि हे कोणाच्याही साधनांहीं पाहावयास मिळावयाचें नाहीं, अतएव हें घोर रूप पाहून तूं भिऊं नको. आतां निरभय व आनंदयुक्त होत्साता पुनः माझें पूर्वीचें रूप पाहा." असें म्हणून, कृष्णानें पुनः आपलें पूर्वरूप अर्जुनास दाखवून, त्याचें समाधान करून त्यास सांगितलें कीं, "अर्जुना, अनन्य भक्तीवांचून अन्य साधनांनीं हें माझें रूप कोणालाही दिसावयाचें नाहीं, व प्राप्त व्हावयाचें नाहीं."

याप्रमाणें या अकराव्या अध्यायांत, कृष्णानें आपलें विश्वरूप अर्जुनास दाखविलें त्याचें वर्णण आहे, म्हणून यास **विश्वरूपदर्शन** हे नांव दिलें आहे.

**अध्याय १२**—बारावे अध्यायाचे आरंभी अर्जुन कृष्णास प्रश्न करितो कीं—"कृष्णा, जे योगी भक्त सतत तुझी भक्ति करितात, आणि जे निर्गुण ब्रह्माची उपासना करितात, त्या दोहोंत उत्तम योगी कोण?" कृष्ण म्हणतो- "अर्जुना, जे योगी दृढभावे मत्परायण होऊन माझी सतत भक्ति करितात, ते मला उत्तम योगी वाटतात. निर्गुण ब्रह्मोपासना करणारेंही मजप्रतच येतात. परंतु ही निर्गुण उपासना मनुष्यास अत्यंत क्लेशसाध्य आहे. यास्तव जे सर्व कर्में मला अर्पण करून अनन्यभावेंकरून माझें ध्यान व आराधना करितात, त्यांस मी लौकर जन्ममरणदुःखापासुन सोडवितो. यास्तव तूं आपलें चित्त व बुद्धि माझें ठाईच ठेव; म्हणजे मरणानंतरही मजपाशीच राहशील. जर चित्त स्थिर न होईल, तर तें स्थिर करण्याचा अभ्यास कर; अभ्यासही न होईल, तर सर्व कर्में मला अर्पण कर, म्हणजे तुझें कल्याण होईल. हेंही न होईल, तर दृढनिश्चयानें कर्मफलाची वासना सोड अभ्यासाहून ज्ञान श्रेयस्कर; ज्ञानाहून ध्यान विशेष; ध्यानाहून कर्मफलाचा त्याग, आणि त्यागाहून शांति विशेष. आतां मला प्रिय असा भक्त कोण, हें तुला सांगतों. जो कोणाचाही द्वेष करीत नाहीं, जो प्राणिमात्राशीं मित्रत्वानें वागतो, जो करुणायुक्त, जो आसक्तिहीन, जो निरभिमाम, जो सुखदुःख समान मानितो, जो नित्य संतुष्ट असतो, जो योगी मनोनिग्रही. दृढनिश्चही, जो चित्त आणि बुद्धि माझेठायीं ठेवितो, तो भक्त

मला प्रिय. ज्यापासून लोक पीडा पावत नाहींत व लोकांपासून ज्यास पीडा होत नाहीं, जो हर्ष, विषाद, भय, दुःख यांविरहित, तो मला प्रिय. जो निरपेक्ष, व पवित्रमति, जो दक्ष, उदासीन, व भयरहित, जो सर्व ऐहिक खटाटोप टाकतो, तो भक्त मला प्रिय. जो बाह्य सुखांत आनंद मानीत नाहीं, व दुःखांची खंती मानीत नाहीं, जो निरिच्छ असून कशीहि स्थिति आली तरी उदासीन राहातो, तो भक्त मला प्रिय. जो निसंग होत्साता, शत्रुमित्र, मानापमान, शीतोष्ण, सुखदुःख समान मानितो; ज्यास निंदा आणि स्तुति सारखी वाटत्ये; जो मननशील व मितभाषी; जो जें कांहीं मिळेल त्यांत संतुष्ट राहातो; ज्याची गृहादिकांचे ठायीं आसक्ति नाहीं; आणि जो स्थिरबुद्धि;-तोच भक्त मला प्रिय. जे भक्त माझ्या या धर्मपर व मोक्षसाधक बोधावर भाव ठेऊन तदनुरूप उपासना करितात, ते भक्त मला अत्यंत प्रिय होतात."

याप्रमाणें या बाराव्या अध्यायांत मुख्यत्वेंकरून भक्तीचें लक्षण वर्णन केलें आहे; यास्तव यास **भक्तियोग** असें नांव दिलें आहे.

या दुसऱ्या सहा अध्यायांत अनन्यभावेंकरून परमेश्वराची भक्ति हा मोक्षप्राप्तीचा मुख्य उपाय सांगितला आहे. तथापि ही भक्ति ज्ञानानें परमेश्वराचें स्वरूप जाणून करावी; आणि अवश्य कर्तव्यकर्म निष्कामबुद्धीनें करीत राहावें, असें सांगितलें आहे.

**अध्याय १३**—शेवटच्या सहा अध्ययांत मुख्यत्वेंकरून तत्त्वज्ञानाचा उपदेश केला आहे. त्यामध्यें तेरावे अध्यायांत क्षेत्र, क्षेत्रज्ञ, ज्ञान, प्रकृति, पुरुष, या तत्त्वांचा विचार सांगितला आहे. क्षेत्र म्हणजे देहादि सर्व विषय. ते असेः—पंच महाभूतें, अहंकार, बुद्धि, मूलप्रकृति, पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेन्द्रियें, मन, पांच ज्ञानेन्द्रियांचे पांच विषय, इच्छा, द्वेष, सुख, दुःख या सर्वांचा संयोग, चेतना, धैर्य, हें सर्व मिळून क्षेत्र समजावें. असें सांगून कृष्ण म्हणतो—" सर्व भूतांमध्यें क्षेत्रज्ञ मी. आतां ज्ञानाचें स्वरूप सांगतों. मान-रहितता, अदांभिकत्व, विषयांविषयीं अनासक्ति, विनय, संसार, जन्ममरण, वार्धक्य, व्याधी, यांपासून होणाऱ्या नानाविधी दुःखांनीं व्याप्त आहे असें जाणणें, स्त्रीपुत्र, गृह इत्यादिकांविषयीं अनासक्ति सुख, दुःखाची कशीहि स्थिति प्राप्त झाली तरी स्वस्थचित्त असणें, माझी अनन्यभावेंकरून भक्ति, एकांत वास, जनसमूहाचा कंटाळा, नित्य आत्म-ज्ञानपारायणता, आणि तत्वज्ञान, या सर्वांस ज्ञान अशी संज्ञा आहे. जें याच्या विपरीत तें सर्व अज्ञान. आतां ज्ञेय म्हणजे जाणायाचें काय तें सांगतो. जें जाणल्यानें मोक्षाची प्राप्ति होते. अनाद्यनंत, सर्वांतर्यामी, सर्व साक्षी, अतीन्द्रिय, अद्वितीय, चित्स्वरूप, असें जें परब्रह्म तेंच ज्ञेय म्हणजे जाणावयाचें. माझे भक्त हें सर्व जाणून मत्पदाप्रत पावतात.

वर जीं क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ म्हणून सांगितलीं, त्यांसच प्रकृति आणि पुरुष असेंही म्हणतात. या दोहोंच्या संयोगानें सर्व जग निर्माण होतें. जो सर्व नाशिवंत भूतांचे ठाईं व्यापक परमात्मा अलिप्त असा आहे, आणि सर्व भूतें नाश पावलीं तरी जो अवि-नाश राहतो, तो सर्वांदेहीं आहे; तथापि आकाशाप्रमाणें अलिप्त आहे. सूर्य जसा ब्राह्म

जग दाखवतो, तद्वत् हा परमात्मा सर्व बाह्य व अभ्यंतर विश्वाचें ज्ञान आपल्यास देतो. याप्रमाणें क्षेत्र. क्षेत्रज्ञ, आणि प्रकृतिपुरुष यांचें ज्यांस यथार्थ ज्ञान होतें. ते परमपद पावतात.

या तेरावे आध्यायांत मुख्यत्वें क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांचें लक्षण सांगितलें आहे म्हणून यास **क्षेत्रक्षेत्रज्ञयोग** असें नांव आहे.


**अध्याय १४.**—चवदावे अध्यायाचे आरंभी कृष्ण अर्जुनास म्हणतो;–" याहीपेक्षां आणखी मी तुज उत्तम ज्ञान सांगतों; ज्याचे योगानें जन्ममरण नाहींसें होतें, व ज्याचे योगानें सर्व मुनि आजपर्यंत तरले गेले.–माझ्या योगानें प्रकृतीपासून ही सर्व सृष्टि उत्पन्न होते. प्रकृतीचे गुण, सत्व, रज, तम असे तीन आहेत. त्यांचे योगानें आत्म्यास देहाची प्राप्ति होते. त्यामध्यें सत्वगुण निर्मळ आणि ज्ञानमय असल्यामुळें, त्यापासून सुख आणि ज्ञान यांचो प्राप्ति होते. रजोगुण वासनामय असल्यामुळें, त्याचे योगानें नानावासनापूर्वक कर्म घडतें. तमोगुण हा अज्ञानमय असल्यामुळें, त्यापासून मोह, आळस, निद्रा हीं होतात. जेंव्हां सर्व बाह्य व अध्यात्मिक पदार्थांचें यथार्थ ज्ञान होते, तेंव्हां सत्वगुणाचें प्राबल्य झालें असें समजावें. लोभ, प्रपंचशक्ति, नानाप्रकारचे केवळ लौकिक उद्योग, असहिष्णुतता, इच्छा, यांनीं मन व्यापिलें म्हणजे रजोगुण प्रबल झाला असें समजावें. अज्ञान, अलस, दुर्लक्ष, मोह, यांनीं आपल्यास व्यापिलें म्हणजे तमोगुणाचें प्राबल्य झालें असें समजावें. सत्ववृद्धि झाली असतां प्राणी उत्तमलोकाप्रत जातो; रजोगुणाची वृद्धि झालीं असतां कर्मासक्त मनुष्यांत जन्म घेतो; आणि तमोवृद्धि झाली असतां अज्ञानयोनीमध्यें जन्म घेतो सत्वगुणाचें फल निर्मल सुख, रजोगुणाचें फल दुःख आणि तमोगुणाचें फल अज्ञान. सत्वगुणापासून ज्ञान होतें; रजोगुणापासून लोभ होतो; आणि तमोगुणापासून प्रमाद, मोह होतो. हे गुणच सर्व कर्मांस कारण. जो गुणतीत झाला तो तोच जन्ममरणापासून मुक्त होतो. " त्यावर अर्जुन विचारितो,—" जो त्रिगुणातीत झाला, त्याचीं लक्षणें कोणतीं ? " त्यावर त्यास कृष्ण म्हणतो,—" जों इच्छाद्वेषरहि; जो उदासीन, सुखदुःखीं ज्याची समान मति; जो स्वस्थचित, सुवर्ण, मृतिका, आणि भाषाण ज्यास समान; निंदा स्तुति, अपमान शत्रु मित्र, ज्मास समान; सर्व ऐहिक व्यवहारांविषयीं जो अनासक्त; जो अनन्यभावें माझी भक्ति करितो, तो त्रिगुणातीत समजावा. तोच ब्रह्मपदास योग्य होतो. शाश्वत ब्रह्मपद, मोक्ष, सनातन धर्म, आणि निरविकल्प सुख हीं माझेच ठायीं वास करितात. "

याप्रमाणें या चवदाव्या अध्यायांत त्रिगुणांचें वर्णन केलें आहे, म्हणून यास **गुणत्रयविभाग योग** असें नांव आहे

**अध्याय १५**–पंधरावे अध्यायांत प्रपंचास अश्वत्थ वृक्षाची उपमा देऊन, त्याचा अनासक्ततेनें त्याग करून शाश्वत पद शोधावें, आणि परमात्मपदाप्रत पावावें असें सांनि-

तलें आहे. " जे मान, मोह, आणि आसक्ति यांविरहित, जे इच्छा, द्वेश, सुख, दुःख, काम, क्रोध यांविरहित, तेच त्या पदास योग्य होतात. जें पद सूर्य, चंद्र किंवा अग्नि प्रकाशानें दृष्टीस पडत नाहीं, जें केवळ ज्ञानगम्य; जें प्राप्त झालें असतां पुनः जन्ममरण घडत नाहीं; तें माझें परम श्रेष्ठ स्थान. देह वर्तविणारा जीव माझाच अंश आहे. मी सर्वव्यापक, सर्वांतर्यामी; असें वेदांत माझ्या स्वरूपाचें वर्णन केलें आहे. या जगांत दोन तत्त्वें आहेत–क्षर आणि अक्षर. क्षर म्हणजे सर्व भूतें; अक्षर म्हणजे तत्त्व, चैतन्य. या दोहोंतूनही जें उत्तम तत्त्व त्याला परमात्मा असें म्हणतात. जो जगद्व्यापक, जगत्पालक, अविनाशी परमेश्वर, तो सर्वांहून श्रेष्ठ. मी परमात्मा क्षर अक्षर या दोन्ही तत्त्वांहून श्रेष्ठ आहें; त्यमुळें वेदांमध्यें आणि लोकांमध्यें मला पुरुषोत्तम असें नांव आहे. हें अत्यंत गूढ ज्ञान मीं तुला सांगितलें. हें ज्याला प्राप्त होतें तो अनन्यभावें माझी भक्ति करून कृतकृत्य होतो."

या प्रमाणें या पंधराव्या अध्यायांत उत्तम पुरुषाचें वर्णन केलें आहे म्हणून यांस **पुरुषोत्तमयोग** असें नांव आहे.




**लहान मुलांच्या आंकडीवर**

**जुनें आणि प्रसिद्ध औषध**

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

**सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.**

**: स्टॉकिस्ट :**

**कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.**

# विश्वामित्रानें ब्रह्मर्षिपद कसें मिळविलें ?

पूर्वींच्या काळीं वशिष्ठ भारद्वाज यांसारखे तपस्येच्या बळावर ब्रह्मपदास पोहोंचलेले जे थोर पुण्यात्मे होऊन गेलें, त्यांत विश्वामित्र ऋषींचें स्थान फार आगळें होतें. तो एक असामान्य व म्हणेन तें तपस्येच्या बळावर करून दाखविणारा थोर ऋषी होऊन गेला. तो भयंकर रागीट होता. क्रोधाच्या भरांत तो काय करील हें सांगतां येणें कठीण होतें : देवहि त्याला थरथर कांपत असत मग इतरांचें काय ? त्याच्या तपस्येची आहे ही कथा !

राजा दशरथाच्या काळीं त्रिशंकु नामक ख्यातनाम सूर्यवंशीय राजा राज्य करीत होता. ह्या राजाचें आपल्या शरीरसौंदर्यावर इतकें मन जडलें होतें कीं, मरणकालीं हा देह सोडून आपणांस येथून जावें लागणार आहे. हा विचारहि त्याच्या मनास सहन होत नसे. आपण सदेह स्वर्गास जावें अशी त्याची इच्छा होती.

आपली ही इच्छा साध्य व्हावी या उद्देशानें तो आपले कुलगुरु वसिष्ठमुनी ह्यांजकडे विचारविनिमय करण्यासाठीं आला असतां वसिष्ठांनीं त्याला ही गोष्ट अशक्य कोटींतील असल्यामुळें तूं हिच्यामागें लागूं नकोस, असा सल्ला दिला. मुनिवर्यांचा हा सल्ला राजास पटला नाहीं. मग तो वसिष्ठमुनींच्या पुत्राकडे गेला आणि त्यानें ह्या कामीं त्यांचें साहाय्य मागितलें. आपल्या पित्यानें जी गोष्ट करण्या-विरुद्ध सल्ला दिला आहे तीच गोष्ट हा आपणांस करण्यांस सांगत आहे. हें त्यांना कळतांच त्यांचा क्रोध अनावर आला. राजाची खूप निर्भत्सना करून त्यांनीं त्यास वाटेला लावलें.

**त्रिशंकूला शाप**

पण त्रिशंकु माघार घ्यावयास कबूल नव्हता. उलट तो ऋषिपुत्रांना म्हणाला कीं, तुम्ही किंवा तुमचा पिता ह्यांच्यापाशीं माझा हेतु सफल करून दाखविण्याची शक्तीच नाहीं. तुम्ही माझें काम करून देत नसलांत तर मी तुमच्यापेक्षां जे अधिक दैवी शक्तीचे आहेत अशांच्याकडे जाईन. मुनिपुत्र ह्यावर क्रोधाविष्ट होऊन त्याला म्हणाले, " तूं चांडाळ होशील ! "

दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळी त्रिशंकु उठून पाहातो तों काय ! त्याची देहयष्टि पार बदलून गेली होती. तो चांडाळ बनला होता. त्याच्या पूर्वींच्या देहसौंदर्याचा पूर्ण लोप होऊन आतां तेथें कुरूपता तेवढी शिल्लक राहिली होती. राजवस्त्रांच्या जागीं फाटक्या, विटक्या चिंधोट्या आल्या होत्या.

त्याच्या मांडलिकांना आणि प्रजाजनांना त्याची ओळख पटेनाशी झाली. त्यांनीं त्याला राज्याबाहेर हांकलून दिलें. वणवण करून आणि भुकेनें व्याकुळ होऊन तो आपलें अखेरचें क्षण मोजीत असतां योगायोगानें विश्वामित्राच्या आश्रमाशी आला.

राजाची ही स्थिति पाहून विश्वामित्राला कणव आली. त्यानें त्याला विचारलें " तूं राजा त्रिशंकू ना ? मग तुला ही अवस्था कशी काय प्राप्त झाली ? कुणाच्या शापानें ?

ऋषींचे पाय धरून राजानें दीनवाणेपणें झालेला सर्व वृत्तांत कथन केला आणि तो म्हणाला. नेहमींच सत्प्रवृत्तींच्या मार्गानें चालणारा असा मी राजा आहे. माझ्या धर्मापासून मी केव्हांहि तिळभरहि चळलेलो नाहीं. माझ्या हातून कांहीं पाप-कर्म घडले आहे किंवा कांहीं चूक झाली आहे असेंहि नाहीं. माझा कुलगुरु आणि त्याचे पुत्र ह्यांनीं माझा त्याग करून शाप दिल्यामुळें माझी ही अशी स्थिति झाली आहे.

**विश्वामित्रांचें आश्वासन**

केवळ एका शापामुळें चांडाळ बनलेल्या त्या राजाची स्थिति पाहून विश्वा-मित्राला दया आली. विश्वामित्राचा स्वभावच असा आत्यंतिक होता. लहानसहान कारणासाठींसुद्धां तो अनेकदां क्रोध, करुणा, प्रेम, ह्यांसारख्या भावनांच्या आहारीं सहजासहजीं जात असे.

गोड शब्दांनीं त्रिशंकूला धीर देत तो म्हणाला, हे राजा अत्यंत धर्मपरा-यणतेनें राज्यकारभार करण्याबिषयीं तुझी जी ख्याति आहे ती माझ्या कानीं आली आहे कांहीं घाबरूं नकोस, मी तुझ्या पाठीशीं आहे. तूं याचि देहि स्वर्गात जावेंस ह्यासाठीं मीं यज्ञ करावयाचें ठरविलें आहे. तुझ्या गुरूचा तुला शाप असला तरी हेंच चांडाळाचें शरीर घेऊन तूं स्वर्गात प्रवेश करशील. ह्यांतील एक शब्दहि मी खोटा पडूं देणार नाहीं."

आणि मग विश्वामित्र एका महान् आणि अभूतपूर्व अशा यज्ञाच्या व्यवस्थेला लागला.

सर्व ऋषिमुनि आणि त्यांचा शिष्यगण ह्यांना यज्ञासाठीं पाचारण करण्या-विषयीं त्यांनीं आपल्या शिष्यांस सांगितलें. विश्वामित्राचें आमंत्रण म्हणजे जवळजवळ आज्ञेच्याच स्वरूपांत असल्यामुळें त्याला नकार द्यावयास कुणी धजलें नाहीं. सर्वांनीं यज्ञास उपस्थित राहावयाचें मान्य केलें,

नकार मिळाला तो फक्त वसिष्ठमुनींच्या पुत्रांकडून. नुसता नकारच मिळाला नव्हे, तर त्यांनीं ह्या यज्ञाची खूप थट्टामस्करीही केली : ' एके काळीं क्षत्रिय असलेला ऋषि ह्या यज्ञाचें पौरोहित्य करणारा होता आणि एका गलिच्छ चांडाळाकडे यजमान-पद आलें होतें. असला कसला हा यज्ञ !

वसिष्ठमुनींच्या पुत्रांनीं केलेल्या ह्या निर्भर्त्सनेचा वृत्तांत कानीं येतांच विश्वामित्राच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्या क्रोधावेगांत त्याच्या मुखांतून शापवाणी बाहेर पडली कीं, वसिष्ठऋषींचे पुत्र मृत्युमुखीं पडतील आणि पुढलि सात जन्म ते, जी जात कुत्र्याचें मांस खाऊन जगते, अशा एका जातींत जन्म घेतील.

त्रिशंकूच्या अंगांतील विशेष गुणांचें स्तुतिस्तवन सुरू झालें. त्याला सदेह स्वर्गांत जातां यावें यासाठीं यज्ञास उपस्थित असलेल्या सर्व ऋषि-महर्षींच्या साहाय्याची याचना करण्यांत आली.

विश्वामित्राच्या असामान्य दैवी शक्तींची आणि क्षणार्धांत त्याच्या क्रोधाविष्ट होण्याच्या त्याच्या प्रवृत्तींची चांगलीच जाणीव असल्यामुळें, सर्व ऋषिमुनींनीं आपापल्या परीनें जेवढा हातभार लावतां येईल तेवढा लावला. मग देवांना स्वर्गांतून खालीं उतरून यज्ञाचे बली स्वीकारण्यासंबंधीं आवाहन करण्यांत आलें. पण एकही देव त्या आवाहनास पावला नाहीं. विश्वामित्रानें मांडलेल्या ह्या यज्ञकर्माला मिळावें तें यश मिळालें नव्हतें, ही गोष्ट ह्यावरून स्पष्ट दिसत होती. विश्वामित्राच्या जिवाची होत असलेली तगमग पाहून यज्ञास आलेले ऋषिमुनि स्वतःशींच हंसत होते.

**सारें पुण्य पणाला लाविलें**

विश्वामित्राचा राग अनावर झाला. घृताची पळी तशीच होमकुंडांत धगधगणाऱ्या ज्वालांवर धरीत तो गरजला, "हे त्रिशंकु ! आतां माझ्या शक्तीचें गारुड पाहा. तुझ्या कल्याणासाठी आजवर पदरीं बांधलेलें माझें सर्व पुण्य मी स्वर्गलोकीं पाठवीत आहे. माझ्या तपश्चरणांत कांहीं तेज असलें तर हें स्वर्गलोकी चाललेलें माझें पुण्य तुलाही सदेव तेथें घेऊन जाईल. देवांनीं मीं देऊं केलेल्या नैवेद्याचा स्वीकार केला नसला तरी मला त्याची विवंचना नाहीं. हे राजा त्रिशंकु, लाग चढायला स्वर्गाच्या दिशेने ! "

आणि खरोखरच, विश्वामित्राचें गारुड चमत्कार घडवूं लागलें. तो चमत्कार पाहून उपस्थितांचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसेना. आपलें चांडाळे शरीर घेऊन त्रिशंकु स्वर्गाच्या दिशेनें अंतराळांत चढूं लागला होता. विश्वामित्राच्या तपाचें तें सामर्थ्य पाहून जग विस्मयचकित झालें होतें.

त्रिशंकु स्वर्गांत गेला. "ह्या चांडाळ देहानें स्वर्गांत पाऊल टाकणारा कोण आहेस ? आपल्या धर्मगुरूचा शाप मिळणारा महामूर्ख तो तूंच ना ? चल... चल...आल्या पावलीं तूं माघारीं जा. येथें तुला थारा नाहीं." असें म्हणत इंद्रानें त्याला खालीं ढकलून दिलें.

खालीं डोकें आणि वर पाय घेऊन त्रिशंकु स्वर्गांतून गडगडत खालीं येऊं लागला. "विश्वामित्रा,...मला वांचव...मला वांचव..." असा तो आक्रोश करीत होता.

विश्वामित्रानें हें सर्व पाहिलें तेव्हां पुन्हां क्रोधाग्नि त्याच्या नसानसांतून धगधगला. देवांना आतां चांगला धडा शिकविलाच पाहिजे, अशा निश्चयानें तो खालूनच त्रिशंकूला उद्देशून ओरडला, "थांब, तेथेंच थांब!" आणि काय आश्चर्य! त्रिशंकूचें अवतरण खरोखरच स्थिरावलें. अंतराळांत होता तेथेंच तो थबकून राहिला. तो खालींहि येईना, वरहि त्याला जातां येईना. एखाद्या नक्षत्रासारखी ती तळपत होती. विश्वामित्र आतां जणूं त्राति-ब्रह्माच बनली होती. दक्षिणेकडील गगनांगणांत एक नवीन नक्षत्रलोक निर्माण करावयाचें त्याच्या मनानें घेतलें. नव्या नक्षत्रलोकाप्रमाणेंच एक प्रति—इंद्र आणि नवा देवलोकही त्याला निर्माण करावयाचा होता.

**शेवटीं देव शरण आले**

हे कार्य त्यानें प्रत्यक्षपणें हातीं घेतलें तेव्हां मात्र देवांची पांचावर धारण बसली विश्वामित्राच्या दैवी शक्तीची त्यांना भीति होतीच. मग ते विश्वामित्राकडे आले आणि अत्यंत विनम्रपणें त्याला म्हणाले, "त्रिशंकु अंतराळांत आतां आहे तेथेंच राहूं दें. तूं निर्माण केलेलीं इतर नक्षत्रेंहि शाश्वत कालापर्यंत तुझ्या कीर्तीसारखींच चमकत राहूं देत. हे ऋषिवर्य, आतां तुझा क्रोधाग्नि आंवरतां घे आणि तुझा स्नेहाचा हात आम्हांला दे."

देव असे आपणाला शरण आलेले पाहून विश्वामित्रास मोठें समाधान वाटलें. जेवढ्या लवकर तो क्रोधाविष्ट झाला होता तेवढ्याच लवकर तो शांतहि झाला आणि त्याने आपलें प्रतिसृष्टि निर्माण करण्याचें कार्य आंवरतें घेतलें. पण ह्या प्रचंड कार्याचा खटाटोपांत त्यानें आजवर प्राप्त करून घेतलेल्या सर्व दैवी शक्तींचा ऱ्हास झाला होता. आतां पुन्हा तपश्चरणाला त्याला प्रारंभ करावा लागणार होता.

ह्यानंतर विश्वमित्र पश्चिमेकडे पुष्करला गेला आणि तेथें त्यानें पुन्हा तपश्चरणास सुरुवात केली. बरींच वर्षें हें घनघोर तप केल्यावर आतां तें फळास येणार तेवढ्यांत असें कांहीं घडलें कीं, पुन्हां तो आपल्या क्रोधाग्नीस बळी पडला आणि त्याच्या भरांत त्यानें स्वतःच्याच पुत्रांना शापभ्रष्ट केलें. क्रोधाग्नि थंड झाल्यावर तो भानावर आला तेव्हां कुठें आपण काय करून बसलों ह्याचें भान त्याला आलें. त्यानंतर पुन्हा म्हणून क्रोधाविष्ट व्हायचें नाहीं असा मनाचा निश्चय करून त्यानें आसनमांडी ठोकली आणि नव्यानें तपश्चरणास प्रारंभ केला.

ह्या तपश्चरणाला बरींच वर्षें लोटल्यानंतर ब्रह्मदेव आणि इतर देव त्याच्यासमोर प्रगट होऊन म्हणाले, "हे कौशिका, तुझें तप फळाला आलें आहे. आतां तूं केवळ राजाच राहिलेला नाहींस. आतां तूं खराखरा ऋषि झाला आहेस!"

विश्वामित्राला असा आशीर्वाद देऊन ब्रह्मदेव अंतर्धान पावले.

मला ब्रह्मर्षिपद पाहिजे

ऋषिपदाची प्राप्ति झाली तरी विश्वमित्राच्या दृष्टीनें ती अत्यंत दारुण निराशेची गोष्ट होती. त्याला व्हायचें होतें ब्रह्मर्षि, वसिष्ठाशीं समबल आणि देवांनीं तर त्याला दिलें होतें अवघें ऋषिपद.

वसिष्ठाच्या हातांतील ब्रह्मदंडानें त्यानें सोडलेलीं अस्त्रें गिळून टाकलीं होतीं तसाच प्रकार विश्वामित्राच्या ह्याही तपाच्या बाबतींत घडला होता. त्याच्या तपस्साधनेला मिळावें तें फळ मिळालें नव्हतें. त्यानें ह्याहूनही अधिक घोर असें तप करण्याचें ठरविलें.

देवांना अर्थातच हें आवडलें नाहीं. आपल्या मंत्रमुग्ध करून सोडणाऱ्या मादक सौंदर्यानें आणि चेष्टितांनीं त्याला भुरळ पाडण्यासाठीं देवांनीं मेनका ह्या अप्सरेला पृथ्वीतलावर जाण्याची आज्ञा केली. मेनका पुष्करला विश्वामित्र तपश्चरण करीत होता तेथें आली आणि आपल्या चेष्टितांनीं तिनें त्याचें लक्ष आपल्याकडे वेधून घेण्याचा प्रयत्न केला. विश्वामित्राची आणि तिची नजरानजर झाली आणि अखेर तिच्या सौंदर्याला तो फशीं पडला. त्याचा तपोभंग झाला. दहा वर्षेंपर्यंत तो मेनकेच्या कामचेष्टितांच्या मधुर स्वप्नांत दंग झाला होता. आपल्या तपाचें त्याला विस्मरण पडलें होतें.

अखेर हें स्वप्न विरलें आणि तो भानावर आला तेव्हां भयभीत होऊन कांपत उभ्या राहिलेल्या मेनकेकडे त्याची दृष्टि गेली. त्यानें तिच्नाकडे सहानुभूति पाहिलें आणि तो म्हणाला, " भिऊं नकोस, मी तुला शाप देणार नाहीं; कारण दोष तुझा नसून माझाच होता. आपल्या चेष्टितांनीं माझा तपोभंग करण्यांत तूं केवळ आपल्या स्वामींच्या आज्ञेशीं बांधलेली होतीस." ह्यानंतर दुःखित अंतःकरणानें पुनश्च अतिघोर तपश्चरण करण्यासाठीं त्यानें हिमालयाचा रस्ता धरला.

आपल्या इंद्रियांवर पूर्ण विजय मिळवून त्यानें तेथें सहस्र वर्षे तप केलें. सहस्र वर्षांनंतर देवांच्या विनंतीवरून ब्रह्मदेव त्याच्यासमोर प्रगट झाले आणि मधुरतेनें त्याला म्हणाले, " महर्षि म्हणून तुझें स्वागत करतांना मला आनंद होत आहे आणि पवित्र महर्षिपद तुला अर्पण करण्यासाठीं मी येथें आलों आहे."

ब्रह्मदेवानें केलेल्या स्तुतीमुळें किंवा आपल्याला केवळ महर्षिपदच देऊं करण्यांत आलें आहे ह्या निराशेच्या जाणीवेनें, विश्वामित्रानें आपला तोल जाऊं दिला नाहीं. ब्रह्मदेवास आदरपूर्वक नमस्कार करून त्यानें त्या सृष्टिनिर्मात्यास विनम्रभावें विचारलें, " महर्षियपद मिळालें म्हणजे इंद्रियांवर विजय मिळविला असें होईल का ?"

ब्रह्मदेव म्हणाले, " नाहीं, अर्थातच नाहीं. पण हे ऋषिव्याघ्रा, इंद्रियांवर विजय मिळविण्यासाठीं आपले प्रयत्न तूं असेच पुढें चालू ठेव."

ब्रह्मर्षिपद प्राप्त करून घेण्याच्या निश्चयानें विश्वामित्रानें आणखी सहस्र वर्षे त्याहूनही भयंकर असें तप केलें. देवांची पांचावर धारण बसली.

**रंभेचा सहकार**

इंद्रानें रंभेला बोलावून घेतलें. आणि आपल्या शृंगारचेष्टितांनीं विश्वामित्राचा तपोभंग करून ये, अशी तिला आज्ञा केली. रंभेला विश्वामित्रापुढें एकट्यानें जाण्याचें धैर्य होत नव्हतें. पण इंद्रानें तिला अभय दिलें आणि म्हटलें, " मदन आणि वसंत हेही तुझ्याबरोबर येतील. " अगदींच नाइलाज झाला तशी ती निघाली. विश्वामित्र तप करीत होता त्या अरण्यांत तिनें पाऊल टाकल्याबरोबर तें वासंतिक वैभवानें नुसतें ओथंबून गेलें. पुष्पसुगंधित दक्षिणवारा झुळझुळ वाहूं लागला. कोकिळांना कंठ फुटले. रूपवतीला साथ करण्यासाठीं तिच्याबरोबर वसंत-मदनाची जोडी दिली होती ती काय उगीचच ! सृष्टीच्या रूपांत घडून येणारा हा बदल गेल्या सहस्रावधि वर्षांत विश्वामित्राला पारखा झाला होता. आज अकस्मात् साऱ्या सृष्टीनें नवचैतन्याचें हें अहेव लेणें परिधान करतांच विश्वा-डोळे उघडले आणि एक अतुलनीय सौंदर्य असलेली अप्सरा आपल्याकडे पाहून हसत उभी असल्याचें त्याला दिसलें. सुगंधाचा, गीतांचा साज घेऊन येणाऱ्या वसंताचाच आत्मा जणूं त्याच्या समोर उभा होता. पण आपला तपोभंग करण्याच्याच उद्देशानें केवळ देवांनीं रचलेला हा डाव आहे हें त्याच्या लक्षांत आलें तेव्हां क्रोधाग्नीची एक तप्त ज्वाला त्याच्या अंगांगांतून सळसळत गेली आणि त्याच क्षणीं त्याच्या मुखांतून शापवाणी बाहेर पडली : " हे रंभे ! क्रोधावर आणि वासनावर विजय मिळविण्याच्या उद्देशानें मीं हें तप मांडलेलें असतांना, तूं मला मोह घालून माझा तपोभंग करण्यासाठीं येथें आलीस म्हणून मी तुला असा शाप देतों कीं, तूं एक पाषाणमूर्ति होऊन त्याच अवस्थेंत दशसहस्र वर्षे राहशील. "

**विश्वामित्रास क्रोधाची जाणीव**

आपल्या क्रोधाचें हें प्रगट झालेलें स्वरूप पाहिल्यावर मात्र अजूनहि आपण आपल्या ध्येयापासून किती दूर आहोत ह्याची त्याला जाणीव झाली आाण मोठ्या दुःखित अंतःकरणानें त्यानें हिमालयांतील अरण्याचा त्याग करून पुढील तपस्साधने-साठीं तो पूर्वेकडे गेला. त्यानें तेथें एवढे प्रखर तप केलें कीं, सर्व भौतिक वस्तूंचा विचारही त्याच्या मनांतून नष्टप्राय झाला. त्याच्या शरीरातून बाहेर पडणाऱ्या धूम्र आणि ज्वाला ह्यांनीं विश्व वेढून टाकलें. भयभित झालेल्या देवांच्या प्रार्थनेला मान देऊन ब्रह्मदेव पुन्हां विश्वामित्रासमोर येऊन प्रगट झाले आणि तो ब्रह्मर्षिपदास पोचल्याचें घोषित करून ते म्हणाले, " ब्रह्मर्षीचा विजय असो. विश्वामित्रा, मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहें तुझें कल्याण असो. " विश्वामित्राला परम समाधान झालें.

पण अत्यंत विनम्रपणें तो म्हणाला, "पण मी ब्रह्मर्षि झालों आहें हें वसिष्ठाच्या मुखांतून ऐकल्याशिवाय मला खरा आनंद कसा होईल?"


विश्वामित्राशीं झालेल्या संघर्षांचें स्मरण होऊन वसिष्ठऋषि हंसत हंसत म्हणाले, "तुझ्या घनघोर तपश्चरणाचें फलित तूं प्राप्त करून घेतलें आहेस. हे बघ, आतां तूं खरोखरच ब्रह्मर्षिपदास पोंचला आहेस." सगळीकडे आनंदी आनंद झाला.

राजा दशरथाच्या दरबारीं आकस्मात् येऊन ठेपलेल्या ऋषीची कहाणी ही अशी होती.

---


## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डंबेल्स, लेझीम...यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितो. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना माल पुरवितो.



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स,** ८५ बापू खोटे स्ट्रीट, जांभळी मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर—डी. एच्. साखरकर

# संतोष हीच धनदौलत

या जगांत मनुष्याच्या वांट्यास येणारीं सर्वांत मोठी धनदौलत जर कोणती असेल तर ती म्हणजे 'संतोष' हीच होय, संतोष कोणतीहि बरीवाईट स्थिति वांट्यास येवो, संतोष ! संतोषप्रवृत्ती म्हणजेच या जगांतील स्वर्गसुख !

**रॉकफेलरची कर्मकहाणी**

अमेरिकन कोट्याधिश रॉकफेलर याचें नांव तुमच्या कानावरून कधीं ना कधीं गेलें असेल. तो जगांतील कुबेरांचा कुबेर ! त्याच्याइतका संपत्तीमान या जगांत तोच होता. तो खराखुरा लक्ष्मीपुत्र होता. त्यानें प्रचंड संपत्ति मिळविली ती कशाच्या बळावर ? अवाढव्य व्यापार व व्यापारीं उलाढाली यांच्या बळावर.

त्याच्याजवळ एवढी संपत्ति सांठलेली होती कीं त्याने सर्व अमेरिकेला भोजन कित्येक दिवस देण्याचें मनांत आणिलें असतें तर ती गोष्ट तो सहज करूं शकला असता.

म्हणेल तें करणारा व करून दाखविणारा रॉकफेलर होता. त्याच्यासमोर चढाओढींत उभें रहाण्याची कोणाचीहि छाती नव्हती.

धनसंपदा, घरेंदारें, जमीनजुमला ज्याच्याजवळ सर्वांत अधिक तो महान सुखी अशी सुखाची कसोटी लावायची असेल तर त्या तिन्ही गोष्टी त्याच्याइतक्या दुसऱ्या कोणाजवळ असण्याची शक्यता नव्हती.

**पैशांमुळें वाटेल तें मिळूं शकतें**

माणसाचा खिसा पैशानें भरपूर भरलेला असला म्हणजे तो काय वाटेल तें करूं शकेल व वाटेल तें घेऊं शकेल. तो उत्तमोत्तम भोजन उत्तमोत्तम व किंमती कपडेलत्ते ! उत्तमोत्तम राजवाडा, मौल्यवान् मोटारी, अलंकार व भोगविलासाचीं किंमतवान् म्हणून जीं जीं साधनें आहेत तीं सर्व तो खरेदी करूं शकला असता.

त्याला या जगांत अशक्य अशी एकहि गोष्ट नव्हती. सारे कांहीं आटोक्यांत व हातांत !

संपदा त्याच्यामागें एकसारखीं हात धुवून लागलेली होती, वयाच्या तेवीसाव्या वर्षीच त्याच्याजवळ १०।१५ लक्ष डॉलर जमा झाले होते.

तो व्यापारधंद्यांत अत्यंत हुषार होता. धाडसी होता. चढउतार ओळखून त्याप्रमाणें जाळें टाकण्यांत तो अतिशय वाकबगार होता. व्यापारधंदे तो नुसते खेळवीत होता. त्याचबरोबर त्याची द्रव्यतृष्णाहि तशीच दांडगी होती. किती कंपन्यांचा तो मालक होता ?

रॉकफेलर धनदौलत मिळवीत होता. वर्षानुवर्षे तिची वाढ अखंडपणें चालूं होती. परंतु त्याची तृप्ति कांहीं होत नव्हती.

**चिंता पोखरीत होत्या**

म्हणतां म्हणतां त्याच्या वयाला त्रेपन्न वर्षें झालीं. या दरम्यान तो संपत्तिवान् कुबेर बनलेला होता; परंतु ? परंतु काय ? तो सुखी होता काय ? त्याच्यामागें एक दोन नाहीं शेंकडो चिंता लागलेल्या होत्या. त्या त्याला रात्रंदिवस पोखरीत होत्या. त्याला शांतता व स्वस्थता मिळवूं देत नव्हत्या.

माणसाजवळ संपदा येते; परंतु आलेल्या संपदेमुळें त्याची तृप्ती होत असते का ? नाहीं. नोकरचाकर यांचा व कंपन्यांचा पसारा बेसुमार वाढलेला असतो. व्यापारांत नुकसान येईल का ? अमूक नोकर खजीनदार आहे तो किंवा दुसरे कोणी अफरातफर करीत असतील का ? कोणी काम चुकारपणा करीत असेल का ? कोणी चोरी तर करणार नाही ? अशा चिंता किती सांगाव्या.

या व इतर नाना प्रकारच्या चिंता त्याचा देह खिळखिळा करून टाकीत होत्या. काय बिचाऱ्याची कर्मकहाणी !

आस्ते आस्ते त्याची भूक कमी कमी होण्याच्या मार्गाला लागली. वाटेल तेवढें किंमती भोजन घेण्याचीं त्याची पात्रता होती. परंतु उपयोग काय त्याचा ? तें पचन झालें पाहिजे ना ?

**भूक नाहीं झोप नाहीं**

त्याला झोपण्यासाठीं मऊ मऊ व मौल्यवान् गाद्यागीरद्या होत्या. परंतु काय त्यांचा उपयोग ? झोपेची कृपादृष्टि वळली पाहिजे ना ? त्याला लागून राहिली होती कसली ना कसली तळमळ ! कसली शांत झोप आणि कसलें काय ?

झोंप काय किंवा पचनक्रिया काय; या गोष्टी लाखों रुपये ओतले तरी मिळूं शकतील का ?

त्याचा उत्साह, त्याच्या चेहऱ्यावरील पूर्वीचा तो तजेला आतां ओसरूं लागला !

कोट्याधिशांचा कोट्याधीश ! कुबेरांचा कुबेर ! आणि काय ही स्थिति त्याच्या वांट्याला आली !

त्याच्या जिवलग नातलगांना व मित्रांना चिंता वाटूं लागली. एवढा मोठा कुबेर आणि त्याची काय ही अवस्था ! मोठमोठे डॉक्टर मानसशास्त्रज्ञ आणि कोणी कोणी ! यांची सल्ला घेण्यास येऊं लागले.

**मानसशास्त्रज्ञ डॉक्टरांचा सल्ला**

मोठमोठे मानसशास्त्रज्ञ डॉक्टर रॉकफेरलला तपासून गेले. त्यांनीं जें कांहीं सांगितलें त्याचें सार सर्वस्व हें होतें;—" माणसानें लोभ सोडला पाहिजे. मनांत ज्याच्या लोभ अधिक तेवढ्या प्रमाणांत त्याच्या चिंता अधिक ! द्रव्यतृष्णा ही अत्यंत हानीकारक आहे. ती तृप्त कधींच होत नाहीं. उलट वाढत जाते. आपण संतोषाची

समाधानाची कांस घट्ट पकडली पाहिजे. संतोष, तृप्ति हें अमृत आहे. तें जीवनदायी रामबाण औषध आहे. त्याच्यासारखें जिवाला सुख देणारें दुसरें औषध नाहीं.

तेव्हां रॉकफेलरला वाचवायचें असेल तर द्रव्यतृष्णेपासून त्याला खेचून दूर नेलें पाहिजे. तो मोह त्यानें अजिबात सोडून दिला पाहिजे. त्याचें लक्ष इतर विषयांकडे मनोरंजनाकडे वळविलें पाहिजे तरच त्याचा बचाव होईल.

**मित्राची करामत**

रॉकफेलरचा गार्डनर या नांवाचा भागीदार होता. त्याचे रॉकफेलरवर भारी प्रेम होतें. त्यानें एक सुंदर सर्व व सुखसोईसंपन्न असें जाहज खरेदी केलें. त्यांत बसून प्रवास करण्यासाठीं बाहेर पडायचें, मागील साऱ्या चिंता मागेंच ठेवायच्या. त्यापैकीं एकही चिंता सांगाती घ्यायची नाहीं. मग बरोबर घ्यायचे काय ? जन्मदात्या परमेश्वराचें भजन म्हणायचे व त्यांत रंगून जायचें. बाकी मनांत दुसरा कसलाही विचार येऊं द्यायचा नाहीं.

मित्रानें पुढील धोका ध्यानीं आणून ही सारी व्यवस्था केली खरी परंतु रॉक-फेलरचें मन तयार होईना ! अमूक कामें माझ्यासाठीं अडून रहातील ! तमूक गोष्टी मी नाहीं तर कशा घडून येतील ?

मित्रानें सांगितलें तें कांहीं नाहीं कोणामुळें कोणाचेंहि या जगांत अडत नाहीं. जें कांहीं व्हायचें तें सर्व होऊन जातें. त्याची चिंता तुला आणि मला नको !

त्या प्रेमळ मित्रानें जबरदस्तीनें रॉकफेलरला त्या मोहजाळांतून बाहेर खेचलें ! तो आपल्याबरोबर त्याला जहाजांत घालून दूर दूर घेऊन गेला !

**मित्रानें यश मिळविलें**

गार्डनरला—रॉकफेलरच्या त्या मित्राला, एकंदर जाणीव होऊन चुकली होती. त्याला चिंतामुक्त करून देवधर्माकडे त्याचें मन वळवणें हेंच त्याला साधायचें होतें. गार्डनरच्या चिरंतन सहवासांत रॉकफेलरच्या मनांत क्रांति घडून आली. तो जन्मदात्या परमेश्वराकडे वळला. भजनाच्या रूपानें त्याचे गुण आळवूं लागला.

लोभापासून, द्रव्यतृष्णेपासून रॉकफेलरची सुटका झाली. सुख कशांत आहे याची उमज त्याला पडली. द्रव्याच्या राशी उभ्या करण्यांत सुख नाहीं तर त्या द्रव्याचा उपयोग शक्य या परीनें दुसऱ्यांना सुखी करण्यासाठीं वापरण्यांत आहे. मिळविण्यापेक्षां देण्यांत आनंद आहे.

रॉकफेलरला जीवनाचा महामंत्र उमगला. साधी रहाणी व उच्च विचार-सरणीचा त्याच्या मनावर पूर्णपणे पगडा बसला.

**रॉकफेलर उमगला व बचावला**

या जगांत धनदौलत कमावण्याकडे सारें लक्ष पुरविण्यापेक्षां यांच्याही पेक्षां दुसऱ्या मौल्यवान् गोष्टी करण्यासारख्या पुष्कळ आहेत.

त्याला समजून चुकलें कीं, या जगांत संतोषासारखें, समाधानासारखें दुसरें सुख नाहीं.

त्यानंतर त्यानें कोणत्याही गोष्टीबद्दल चिंता करायची नाहीं. नेहमीं दुःखितांचें दुःख हरप्रकारें दूर करण्यासाठीं झटायचें, दुसऱ्याचें सुख हेंच आपलें सुख मानायचें व संतोषवृत्तीनें आयुष्य कंठावयाचें. ही जी नंतरच्या आयुष्यांत धनाढ्य कुबेर रॉकफेलरनें संपदा मिळविली तीच खरी व त्याला नवचैतन्य व दीर्घायुष्य यांची जोड करून देणारी संपत्ति होती.


आमच्या शास्त्रकारांनीं सांगितलें आहे कीं—

असंतोषः परं दुःखं संतोषः परम् सुखम्
सुखार्थी पुरुषस्तस्मात् संतुष्टः सततं भवेत्

सर्वांत मोठें दुःख कोणतें ? असंतोष.


सर्वांत मोठें सौख्य कोणतें ? संतोष. यासाठीं ज्याला खरेंखुरें सुख हवें असेल त्यानें सदासर्वकाळ संतुष्ट, समाधानी रहाण्यासाठीं झटलें पाहिजे.

---




दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :—DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून
उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतील
छबिलदास रोड, दादर (W. R.),

# यशाप्रत नेणारीं तीन साधनें

कोणतेंही कार्य असो. त्याची सफलता मुख्यतः तीन गोष्टींवर अवलंबून असते. समय, शक्ति व साधनसामुग्री या तिन्ही गोष्टींचा योग्यप्रकारें सांगड घालण्यावर तुमच्या हातांतील कार्याचें यशापयश अवलंबून असतें.

## अनेकांची तक्रार

पुष्कळ माणसें अशी तक्रार करणारीं आढळून येतात कीं काय करावें हो! अमूक कामें करण्याची फार इच्छा आहे; परंतु काय करणार! वेळच मिळत नाहीं! किंवा जरूर तीं साधनें वा शक्ति नाहीं! परंतु थोडा विचार केला तर असें दिसून येईल कीं, तो बहाणा खोटा असतो. कांहीं तरी टाळाटाळ करण्याच्या हेतूनें तें खोटें कारण पुढें करण्यांत येत असतें. त्यापेक्षां खरी गोष्ट अशी असते कीं, तें काम करण्याची तीव्र इच्छाच नसते. त्या कामाची तळमळ अंतःकरणांत वावरत असली तर वेळेचें, शक्तीचें किंवा साधनांचें कारण तुम्हीं पुढें करणार नाहीं. न करत्याचा वार शनिवार! मनांत बलवत्तर इच्छा असली तर तुम्हीं नेटानें कामास लागाल व जरूर ती साधनसामुग्री तुमच्यामागें आपोआप धांवत येईल. जो कांहीं वेळ वाट्यास येईल त्याचा आपण शक्य तेवढा जास्तींत जास्त सदुपयोग करून घेतला पाहिजे. जी कांहीं शक्ती आहे ती शक्य त्या प्रमाणांत वापरांत आणली पाहिजे व जी कांहीं थोडीबहुत साधनसामुग्री जवळ असेल तिचा उपयोग करून घेतला पाहिजे. अमुक अमुक साधनें मिळतील तेव्हां काम सुरू करीन असें घोकीत स्वस्थ बसून राहिलां तर तुमच्याकडून कोणतेंही कार्य तडीस जाणार नाहीं.

## वेळेची बचत

वेळ नाहीं म्हणावा तर, भलतींसलतीं कामें करायला, निरर्थक चकाट्या पिटायला कुठून वेळ मिळतो? रोजच्या रोज वेळेचा अपव्यय आपण किती प्रमाणांत करीत असतों बरें?

जें काम अत्यंत आवश्यक असें आपण समजतों तें आपल्या हातून तडकाफडकीं पार पडत असतें. येथें वेळेची किंवा कोणतीही सबब पुढें येत नाहीं. समजा कीं, आपल्यापुढें एकदम दोन कामें उभीं राहिलीं. कोणतीं? भोजन करणें व पुण्यास जाणारी गाडी पकडणें. या कामांत महत्त्वाचें कोणतें? गाडी पकडणें. अर्थात् वेळेवर स्टेशनवर जाणें. जेवणें हें महत्त्वाचें असलें तरी तें बाजूला ठेवतां येतें. किंवा गाडी

सुटण्याची वेळ लक्षांत घेऊन आपण जेवण उरकण्याची व्यवस्था अगोदर झटपट केली पाहिजे. येथें तारतम्यभाव वापरायचा असतो.

### नियमन करणें जरूर

तेव्हां वेळ असतो; परंतु तो कोणत्या कामासाठीं व किती वापरायचा, याचा सारासार विचार आपण केला पाहिजे.

थोडासा विचार केला तर असें आढळून येईल. वेळेची तक्रार खोटी आहे. वेळ भरपूर असतो; परंतु आपण त्याचें योग्यप्रकारें नियोजन करीत नाहीं. भलत्या-सलत्या कामांत आपण उगाच किती तरी वेळ खर्च करीत असतों. रोजच्या रोज व्यर्थ जाणाऱ्या वेळेवर आपण नियंत्रण घातलें पाहिजे. त्यासाठीं डोळ्यांत तेल घालून जपलें पाहिजे. एखादें काम आपण शिरावर घेतों. त्यासाठीं किती वेळ लावायचा, तें किती वेळांत संपवायचें याचें अगाऊ धोरण आपण आंखलें पाहिजे. वेळेची जास्तींत जास्त बचत कशी होईल थोडक्या वेळांत बरेंच काम कसें पार पडेल हें पाहिलें पाहिजे.

### वेळ बहुमोल आहे

झोपण्यासाठीं, गप्पागोष्टीसाठीं, खेळण्यासवरण्यासाठीं व रोजचीं आवश्यक कामें करण्यासाठीं आपण किती वेळ खर्च करतों हें बारकाईनें तपासून पाहिलें पाहिजे, व त्यांत कांहीं बचत वा काटकसर करतां येईल कां हें तपासून पाहिलें पाहिजे. वेळेचें मोल पैशापेक्षांही भारी आहे. आपण ‘ वायां जाऊं नेदि क्षण ’ हा नियम आटोकाट अमलांत आणण्यासाठीं झटलें पाहिजे.

आतां आपण साधनसामुग्रीकडे वळूं या. साधनांची उणीव ही सबब साफ खोटी आहे. प्रामाणिकपणें काम करणाऱ्यासाठीं सभोंवार साधनसामुग्री किती तरी पडली आहे. तुम्हीं काम करूं लागा. त्यांत सर्व उत्साह ओता. साधनें तुमचा पाठलाग करीत येतात कीं नाहीं तें पहा !

### साधनांचें काय ?

अहो ! साधनांचें काय घेऊन बसलां आहांत ! तुमची इच्छाशक्ति प्रबल असली पाहिजे. तुमचे हेतू प्रामाणिक असले पाहिजेत. तुम्हीं हातीं घेतलेल्या कार्याशीं एकरूप झालें पाहिजे. म्हणजे जादूची कांडी फिरविल्याप्रमाणें तुमच्यापुढें वाटेल तेवढी साधनें हजर होतील. त्यांची चिंता करायला नको.

काम करणाऱ्या माणसाला साधनसामुग्रीमुळें अडून बसावें लागलें, हा विचार मनांतून हद्दपार करा. जेथें काम करण्याची जिद्द आहे तेथें वाटेल ती हद्द ओलांडून डोंगर-पर्वत तुडवून साधनें तुमच्यापुढें हां हां म्हणतां हजर होतील! स्वतःवर विश्वास

ठेवा. आपल्या हातांतील कार्यांबद्दल श्रद्धा बाळगा. मग ईश्वर तुमची काळजी वहाणारा समर्थ आहे. तुम्हीं नको साधनांची काळजी वहायला !

## अडून कां बसतां ?

अमूक रक्कम जमा झाली किंवा अमूक साधनें अनुकूल झालीं म्हणजे मी माझें काम सुरू करीन असें म्हणून पुरेशा साधनांसाठीं अडून बसणारीं माणसें ठायींठायीं आढळून येत असतात. हें फार वाईट व कार्यनाश करणारें धोरण आहे. अशा रीतीनें वाट पहात बसणाऱ्याकडे जरूर तीं साधनें कधीं येत नाहींत व त्याचें कार्य पूर्ण होत नाहीं !

सतत काम करीत रहा. त्यांत आपलें अंतःकरण अपरंपार ओता. निराश मुळींच होऊं नका. तुमच्या कर्तृत्वाचें व उत्साहाचे फळ तुम्हांला मिळाल्याशिवाय केव्हांही रहाणार नाहीं.

## शक्तिचें काय ?

तिसरा शिल्लक राहिला प्रश्न शक्तीचा, सामर्थ्याचा. शक्ती ही कांहीं बाहेरून आणायची नसते. ती तुमच्याचठायीं वास करीत आहे. तुमच्याठायीं अपरंपार शक्ती आहे. तिचें तुम्हांला भान नाहीं ! तुमच्यापैकीं प्रत्येकांत इकडचें जग तिकडे हालविण्याची शक्ती आहे. तुम्हीं मनांत आणाल तर काय वाटेल तें करूं शकाल. 'मारीन पन्नग मी फोडीन शेषटाळू। भूगोल हा उलथितां मज नाही वेळू'—एवढें आहे अपरंपार सामर्थ्य तुमच्याठायीं !' त्याची जाणीव ठेवा. तो खजिना खोला ! तुमची जी शक्ति दबून, दडून राहिली आहे तिच्यावर फुंकर मारून तिला प्रज्वलीत करा. त्या शक्तीचा विकास करा व ती सत्कारणीं लावा. आपली शक्ती अनाठायीं खर्च होत आहे, तो अपव्यय टाळा. त्या शक्तीचा शोध लावून ती सत्कारणीं लावा; म्हणजे तुमची गणना महान् पराक्रमी पुरुषांत होईल हें निश्चित समजा.



# संत गोरा कुंभार

गोरा कुंभार हा तारढोकीनामक गांवाचा वतनदार होता. तो गृह–सुत–दारा यांनीं संपन्न असून हरि–भक्त होता. तो अतिशय विरक्त असे. खातां, जेवतां, बसतां, उठतां, चालतां, प्रपंच–धंदा करितां अष्टौप्रहर त्याला हरिभजनावांचून कांहीं दिसत नसे. सुखदुःख, मानापमान, स्तुति–निंदा, बरेवाईट, रावरंक यांविषयीं त्याच्या चित्तांत नेहमीं समानभाव असे. एके दिवशी त्याची बायको आपलें लहान पोर अंगणांमध्यें खेळत सोडून पाणी आणण्याकरितां गेली. जवळच मातीचें आळें करून गोरा कुंभार डोळे मिटून चिखल तुडवीत होता. त्याचें पाय आपलें चिखल तुडविण्याचें काम बजावीत होते. पण त्याचें मन हरि–ध्यानांत रंगलें होतें. त्याच्या डोळयांतून सप्रेम जळाचे बिंदु खालीं गळत होते. तो अद्वैतरुपांत विनटला असल्याकारणानें त्याची देहस्फूर्ति नष्ट झाली होती. गोरा कुंभार चिखल तुडवीत असतां ते बालक खेळतखेळत चिखलासन्निध आलें. गोऱ्यानें चिखल गोळा करितांकरितां तें बालकही चिखलांत तुडवून टाकिलें. कांहीं वेळानें त्याची बायको पाणी घेऊन घरीं आली. बालक कोठे दिसत नाहीं असें पाहून ती आपल्या भ्रतारास बालकाबद्दल विचारूं लागली. नवरा काय सांगतो तें ऐकण्याच्या इच्छेनें ती सहज खालीं पहात आहे तों चिखलामध्यें थोडेसें रक्त तिच्या दृष्टीस पडलें. तें पहातांच ती घाबरून त्या गाऱ्याजवळ गेली तों अस्थि, मांस, रुधिर आणि चिखल यांचा चिगदा तिला स्पष्ट दिसला. मग काय विचारतां ! आईच ती; तिनें लागलीच हंबरडा फोडिला. मोठमोठ्यांनीं आक्रोश करून ती नवऱ्याला दोष देऊं लागली. देव देव करून गोऱ्यानें सर्व संसाराचा नाश केला असा दोषारोप करून ती प्राणत्याग करण्याकरितां म्हणून सत्वर जाऊं लागली. बायकोचा विलाप ऐकून गोरा शुद्धीवर आला. डोळे उघडून पाहतो तों प्रथम त्याची बायको त्याच्या नजरेस पडली. आपल्या हृदय–कमलांत रुक्मिणीकांतांनीं वास्तव्य केलें असतांना आपल्या बायकोनेंच आपल्या ध्यानाचा विक्षेप केला असें समजून गोऱ्यानें आपल्या हातांत चक्रदंड धारण केला आणि तो बायकोच्या अंगावर धांवला.

त्या योगानें भयभीत होऊन ती गोरोबास म्हणाली " क्रोध आटपून धरा. माझ्या अंगास हात–बोट लावाल तर तुम्हांला विठोबाची शपथ आहे. " विठ्ठलाची आण ऐकतांच गोरोबा शांतता धरून हरि–भजन करूं लागला.

वाड्यामध्यें पुष्कळ मंडळी जमली होती. त्यांनीं आपापल्या अकलेनुसार गोरोबाची निंदा आरंभिली. त्रिविध जनांची हेळना न ऐकतां गोरोबा एकाग्रमनानें ध्यानस्थच राहिला. निंदाच काय पण आपलें स्वतःचें पोर चिखलांत चिरडलें गेलें याचेंही त्याला भान राहिलें नाहीं.

या गोष्टीस कित्येक दिवस होईपर्यंत घरामध्यें त्याचा व बायकोचा अबोलाच होता. अशानें आपलें निभावयाचें नाहीं असें समजून ती त्याची समजूत घालूं लागली. आल्यामधील मडकीं एकमेकास लागावयाचीच असें सांगून तिनें आपल्या अपराधाची क्षमा मागितली. पण गोरोबा तें कांहीं मानीना. तिच्या अंगाला स्पर्श न करण्यासंबंधानें तिनें घातलेली विठ्ठलाची शपथ मोडण्यास आपण केव्हांही तयार होणार नाहीं असें गोरोबानें निश्चयपूर्वक सांगितलें.

गोरोबाच्या निर्धारानें त्याची बायको चिंताक्रांत झाली. आपल्या पोटीं संतान नसल्यानें वंशहानी होणार या कल्पनेनें ती दुःखित झाली असतां तिनें भ्रताराचा दुसरा विवाह करण्याचा संकल्प मनांत आणिला. ती कांहीं दिवस माहेरी गेली. बापाला आपल्या भ्रताराचा निश्चय कळवून आपली धाकटी अविवाहित-बहीण गोरोबाला देण्याबद्दल तिनें आपल्या आईबापास गळ घातली. गोरोबाही द्वितीयसंबंध करण्यास कबूल झाला. गोरोबाचें दुसरें लग्न यथासांग पार पडलें. जावयाचा निरोप घेऊन परत जातांना सासुस्वशुरांनीं गोरोबास विठोबाची शपथ घालून सांगितलें "आम्हीं दोन्हीं कन्या तुमच्या पदरीं बांधिल्या आहेत. दोघींचा सांभाळ सारखाच करावा. प्रतारणा अगदीं करूं नये." इतकें सांगून ते आपल्या गांवीं निघून गेले. सासऱ्याचा वचनार्थ ध्यानांत घेऊन गोरोबा समाधान पावला. गोरोबानें दोन्हीं बायकांस समबुद्धीनेंच वागविलें. त्यानें पहिलीप्रमाणें दुसऱ्या बायकोशींही सर्व व्यवहार बंद ठेविला. तेव्हां त्याच्या बायकोनें त्यास त्याबद्दल खुलासा विचारिला. त्यानें सासऱ्याच्या शपथेचा उल्लेख करून दुसऱ्या बायकोसही पहिलीप्रमाणेंच वागविण्याचा आपला ठाम निश्चय सांगितला.

गोरोबाचा निश्चय ऐकून कनिष्ठ कांता खट्टू झाली. ती आपल्या बापास दोष लावून आपल्या नशिबाच्या नांवानें तडफडूं लागली. कसेंतरी आपलें समाधान करून त्या दोघींनीं मिळून एकेरात्रीं नवऱ्याचें चित्त पारखण्याचा बेत ठरविला.

गोरोबा आपल्या अंथरुणावर निद्रित असतां त्या दोघीजणी त्याच्या दोही बाजूस येऊन पडल्या आणि त्यांनीं भ्रताराचा एकेक हात आपापल्या हृदयावर ठेवून घेतला. त्यांच्या स्पर्शानें गोरोबा जागा झाला. आपल्या मनांत विषय-कल्पना नसतांना आपल्या हातांनीं पांडुरंगाची शपथ मोडली असें भावून त्यानें आपलें दोन्हीं हात तोडून घेतले आणि तो तोंडानें भजन-गीत गात बसला. नवरा थोडा झालासे पहातांच

त्या दोघी बायका अन्नवस्त्राविषयीं चिंतनांत पडल्या. ज्याच्याघरीं कामधेनू वास्तव्य करिते त्याला कशाचीही चिंता करण्याचें कारण नसतें, तद्वत् ज्याच्या तोंडांत रामकृष्णाच्या नामावलीचें वास्तव्य आहे त्याला संसाराची काळजी नको असें सांगून त्यानें बायकांची समजूत केली आणि अहोरात्र नामस्मरण करीत तो समाधानानें काळ कंठीत राहिला.

पुढें कांहीं दिवसांनीं आषाढी एकादशी प्राप्त झाली. गोरोबा आपल्या दोन्ही पत्न्यांसह पंढरीस गेला. त्या ठिकाणीं नामदेवाचें कीर्तन चाललें होतें. देवाला नमस्कार करून गोरोबा कथेला बसला. त्या ठिकाणीं ज्ञानदेवप्रभृति सर्व संतजन बसले होते. कीर्तन चालू असतां नामदेवानें लोकांना हात वर करून टाळ्या वाजविण्यास सांगितलें. सर्व संतजनांनीं हाताच्या पताका उभारिल्या. तेव्हां गोरोबाला मोठी शरम वाटली. आपल्याला हात नसल्याने आपण हरि-नामाच्या टाळीला मुकलों असें जाणून त्याला फारच खंत वाटली. गोरोबा मनांतल्यामनांत करुणा भाकून धायधाय रडूं लागला. भक्ताचे अश्रू फुकट कसे जातील ? गोरोबाचा हेतु जाणून पांडुरंगानें त्याच्यावर लागलीच कृपा केली. त्याचस्थळीं एकाएकी गोरोबाला हात फुटले. गोरोबानें टाळ्यांचा गजर उसळून दिला. हा चमत्कार पाहतांच त्याच्या ज्येष्ठकांतेनें मोठ्या धोरणानें विठोबापुढें हात जोडिले आणि ती देवास म्हणाली “ आमचा भ्रतार हा तुझा भक्त आहे. तुझ्या भजनरंगात दंग होऊनच त्यानें आपला पुत्र चिखलांत तुडविला. गोरोबाचे हात पुन्हां फुटलें; पण बालकाच्या विरहानें आम्ही सर्व तुझे दासजन कष्टी आहों हें तुला कसें पाहवतें ? ” इतके खऱ्या भावाचे शब्द कानीं येतांच चक्रपाणी प्रसन्न झाले. त्या सभेंमधून गोरोबाचें लहान बालक एकाएकीं रांगत आलें. मूल पाहतांच त्याच्या दोन्ही आयांनीं त्याला पोटाशीं उचलून घेतलें. आपल्या जातीचा अभिमान धरून रुक्मिणीमातेनें गोरोबाला शपथेपासून मोकळे करून बायकांचा स्वीकार करण्याची आज्ञा केली. जगन्मातेचें वचन शिरसावंद्य मानून गोरोबा कीर्तनरंगांत नाचू लागला. सर्व भक्तमंडळींतून आनंदाच्या टाळ्यांचा गजर उसळून राहिला. नंतर पांडुरंगाची मंगल आरती होऊन कीर्तन समाप्त झालें.

मग गोरोबानें सर्व संतमंडळीस आपल्या आश्रमांत नेलें. सर्वांना आसनें देऊन त्यानें त्यांची पूजा केली. सर्वांचें भोजन होऊन निवृत्ति, ज्ञानदेव, सांवता, नामदेव वगैरे संतमंडळी गप्पा मारीत बसली असतांना ज्ञानेश्वर गोरोबास म्हणाला “ तूं आम्हाला आसनें देऊन घटासारखें पुजलें आहेत. तूं कुंभार आहेस. तर आम्हांतून हिरवे भाजले कोण आहेत ते निवडून काढ. ” गोरोबानें या म्हणण्यांतील अर्थ तर्कानें जाणला. त्यानें लागलीच आपलें थापटणें प्रत्येकाच्या डोक्यावर आपटून परीक्षा चालविली. नामदेवाच्या डोक्यावर थापट्या मारिल्यानंतर गोरा म्हणाला ‘ हें

भाजन मात्र अद्यापि हिरवें आहे.' तें ऐकतांच मुक्ताबाईसह सर्व मंडळी हंसू लागली. नामदेव मात्र आपल्या मनांत चूर होऊन गेला. सर्व भगवद्भक्तांत आपण, कमी दरजाचे ठरलों असें पाहतांच नामदेव लागलीच पंढरपुरांत विठोबापाशीं गेला आणि आपला अपमान सांगूं लागला. त्याची उदासीनता पाहून पांडुरंगांनीं नामदेवाला त्याच्या दुःखाचें सर्व कारण विचारिलें. गोरोबानें आपणास 'कच्चे भाजन' ठरवि-ल्याचा मजकूर नामदेवानें विदित केला परमेश्वरांनींही नामदेवास कच्चा ठरवून त्याची व्याख्या समजावून दिली. देव म्हणाले "नामदेवा; तूं माझा जीवप्राण आहेस. पुष्प आणि मकरंद या न्यायानें तूं आणि मी एकच आहों. पण हें तुला चांगलें समजलें नाहीं. तूं गुरु केला नाहींस सबब तूं अद्याप अपक्व आहेस हें संतवाक्य सत्य आहे."

परमेश्वराची ही गुरु करण्याची सूचना ऐकतांच नामदेव म्हणाला "व्रत, तप, यज्ञ, अनुष्ठान, सद्गुरुसेवा या गोष्टी ज्याच्या प्राप्तीकरितां करावयाच्या तो तूं तर माझ्या अक्षय्य ह्रदयांत आहेस; मग मला गुरु करण्याची काय अवश्यकता आहे बॅर ?"

नामदेवाच्या प्रश्नावर देवांनीं उत्तर केलें "आत्मज्ञान प्राप्त होण्याकरितां मी स्वतः देखील रामकृष्ण अवतारी वसिष्ठ आणि सांदीपनी यांना सद्भावानें शरण गेलों. तूं संतांना मान्य व्हावेस अशी इच्छा असेल तर तुला सद्गुरुला शरण हें गेलेंच पाहिजे" हें म्हणणें नामदेवास मान्य होऊन प्रभुच्या सांगण्यावरून नामदेव विसोबा खेचरास गुरु करण्याकरितां मल्लिकार्जुनाच्या देवळांत गेला. त्या ठिकाणीं शाळुंकेवर दोन्हीं चरण ठेऊन विसोबाखेचर निजले होते. हें पाहून नामदेव विस्मित झाला. वधुवरांचें घटित पाहण्यास सुरुवात करितांच एकनाडी दिसून यावी त्याप्रमाणें प्रथमतःच विसोबांचा अवगुण दिसून येतांच नामदेव उदास झाला. तसाच पुढें होऊन साक्षात् पार्वती-रमणाच्या डोक्यावर पाय ठेवणाऱ्या विसोबाला त्यानें त्याच्या उन्मत्त वर्तनाबद्दल दोष दिला. विसोबांनीं आपल्या चुकीची क्षमा मागितली आणि शंकराचें स्थान नाहीं अशा ठिकाणीं आपले पाय उचलून ठेवण्याबद्दल नामदेवास परवानगी दिली. नाम-देवानें विसोबाचे पाय उचलून दुसऱ्या ठिकाणीं ठेविले तों तेथेंही त्यांच्या खालीं शिव-लिंग दिसूं लागलें. तो जेथें जेथें विसोबाचे पाय ठेवावयास जाई तेथें तेथें शंकरच दिसू लागला. अखेर त्याला शिवलिंगावांचून कांहींच दिसेनासें झालें. देवळांतील घंटा, दर्शनाला येणारे नारीनर, फार काय पण तें सर्व शिवमंदिर हीं सर्वत्र नामदेवाला शिवरूपी दिसू लागली. ज्याठिकाणीं शिवलिंग नाहीं. असें स्थळच सांपडत नाहीं. असे पाहून विसोबांचे चरण हातांत धारण केलेला नामदेव चकित झाला. आपण

आपल्या हातांत धारण धरलेले चरणही शिवस्वरूपीच दिसूं लागल्यानें नामदेव त्या चरणानाच वंदन करीत राहिला. नामदेवाचा भाव पाहून विसोबा खेचरांनीं नंद. भाषेमध्ये नामदेवास शिवस्वरूपाचें ज्ञान सांगून त्याचा सर्व संशय घालविला. नामदेवास सर्व जग एकमय असल्याचें पटलें, असें पासून विसोबांनीं त्याच्या डोक्यावर हात ठेवून त्याला स्वरूपज्ञान करून दिलें. नामदेवानें द्वैतखंडण होतांच त्यानें सत्य परमात्म्याची खूण ओळखिली. पुढें नामदेव पंढरीस येऊन त्याची व सर्व संतांचीं गांठ पडली. सद्गुरुप्रसादामुळें तो संतजनांना मान्य झाला. अशा प्रकारें विसोबा खेचरांच्या कृपास्पर्शानें नामदेवाचा कच्चेपणा नाहींसा झाला.

नामदेवाची बायको राजाई हिला आपल्या दारिद्र्याबद्दल नेहमीं हुरहुर वाटे. एके दिवशीं ती पाण्याला जात असतां वाटेनें तिला कमळजा नांवाची एक स्त्री भेटली. ही स्त्री परिसाभागवताची पत्नी होती. परिसाभागवतानें जगदंबा प्रसन्न करून घेऊन तिच्यापासून परिस मिळविला होता. पाण्याच्या वाटेनें घरप्रपंचाच्या गोष्टी बोलतां बोलतां कमळजेनें नामदेवाच्या कोरड्या भक्तीची निंदा केली. आत्मप्रौढी गाण्याच्या इच्छेनें तिनें राजाईस आपल्या परिसाची हकीकत कळविली. राजाईला परीस पाहण्याची जबर इच्छा होऊन ती एक दिवस कमळजेच्या घरीं गेली कमळजेनें तिला परीस दाखविला. राजाईला परिसाचा मोह उत्पन्न झाला. तिनें कमळजेजवळ आपल्या दरिद्रतेची रड गाऊन दाखविली. कमळजेनें भलेपणा धरून राजाईस कांहीं काळ तो परीस उसना दिला. राजाई आनंदानें घरीं आली. लागलीच तिनें घरांतील लोखंडाची प्रत्येक वस्तु सोन्याची करून टाकली. त्यांतील कांहीं सोनें विकून बाजारांतून चमचमीत शिधा आणिला. दोनप्रहरच्या वेळीं नामदेव घरीं आला. त्यानें घरांतील श्रीमंती थाट पाहून त्यासंबंधीं बायकोस प्रश्न केला. राजाई स्पष्ट कांहींच सांगेना; पण नवऱ्याचा विशेष हट्ट पाहून तिनें त्याला परिसाभागवताची सर्व हकीकत कथन केली आणि नामदेवाच्या सुक्या भजनाची चेष्टा केली. नामदेवानें पाहण्याचे मिष करून तिच्या जवळून तो परीस आपल्या हातांत घेतला आणि ताबडतोब चंद्रभागेच्या तीरीं जाऊन त्यानें तो परीस डोहामध्यें फेंकून दिला. अशा प्रकारें उपाधिरहित होऊन नामदेव घरीं येऊन स्वस्थपणें भजन करीत बसला. नवऱ्यानें लोकांची अमोलिक वस्तु नाहींशी केली यामुळें राजाई चिंतातुर रडत बसली.

इकडे परिसाभागवताने आपल्या संबळींत परीस नाहींसा पाहून कमळजेभोंवतीं काहूर केलें. तिनें त्यास झालेला मजकूर सांगितला. परिसाभागवतानें लागलेंच कमळजेला आपला परीस परत आणण्याकरितां राजाईच्या घरीं पिटाळली.

यावेळीं नामदेव घाटावरच होता. राजाई कमळजेस घेऊन मोठ्या लगबगीनें

नामदेवाकडे जाऊन परीस मागूं लागली. नामदेवानें परीस डोहांत टाकल्याचें कळतांच त्या दोघींनीं तेथें आकांत मांडिला. दोघींचा दीर्घ रोदनस्वर ऐकून तेथें मंडळींची गर्दी जमली. कमळजेस परत येण्यास उशीर लागलेला पाहून तिचा नवरा शोध करीत करीत घाटावर येऊन पोंचला. परिसाचा समग्र वृत्तांत कळतांच भागवताला नामदेवाच्या सचोटीचा संशय आला. नामदेवानेंच अभिलाषबुद्धीनें आपला परीस दडपला असावा असा पक्का तर्क करून तो नामदेवाच्या नांवानें ओरडूं लागला. गंमत पाहणारांनाही नामदेवाची लबाडी खरी वाटली. नामदेवानें निष्काम भजनावर भाषण करून वाळूंतून आपला परीस शोधून आणण्याबद्दल भागवताला सूचना दिली. नामदेवाची सूचना ऐकून गंमत पाहणारे लोक हंसू लागले. हे सर्व पाहून आपलें म्हणणें सत्य करून दाखविण्याकरितां नामदेवानें पाण्यांत उडी टाकली आणि एक ओंजळभर वाळू घेऊन तो बाहेर आला. ती वाळू परिसाभागवतापुढें करून नामदेवानें सांगितलें. " हे सर्व खडे परीस आहेत; यांतून तुमचा कोणता तो ओळखून घ्यावा.

कांहीं जण जे नुसतेच अप्रबुद्ध होते त्यांनीं नामदेवाची थट्टा आरंभिली. पण कांहीं हुशार मनुष्यांनीं प्रचीती पाहण्याकरितां लागलीच लोखंडाच्या चुका खिळे आणवून ते त्या वाळूला लावून पाहिले. त्या वाळूपैकीं प्रत्येक खडा लोहाचें सुवर्ण करण्यास समर्थ आहेसें प्रत्यक्ष पाहून सर्वजण आश्चर्यानें मांबावुन गेले. जगन्मातेला प्रसन्न करून एक परीस प्राप्त करून घेतल्याबद्दल धन्यता मानणारा परीसाभागवत नामदेवाच्या हस्तस्पर्शानें बनणारे वाळूचे अनेक परीस पाहून अनुतापयुक्त झाला. त्यानें नामदेवाच्या चरणावर मस्तक ठेविलें. नामदेवानें त्या शरणागतावर कृपा करून त्याला दिव्य ज्ञानानें संपन्न केलें आणि ते सर्व परीस डोहांत भिरकावून नामदेव आपल्या घरीं निघून गेला. तें पाहतांच इतर मंडळीही तेथून आपापल्या मार्गाला लागली.

## जगमित्र नागा.


परळीवैजनाथामध्यें जगमित्रनागा या नांवाचा एक ब्राम्हण राहत असे. तो कुटुंबवत्सल असून भिक्षेवर उदरनिर्वाह करीत असे. तो वैराग्यभरित असून लोकप्रिय कीर्तनकार होता. त्याची निरपेक्षिता पाहून लोकांत त्याची मोठी कीर्ति गाजत होती. तुळशीची पुजा चाललेली पाहून भांगेला संताप यावयाचाच. जगमित्राची प्रतिष्ठा ऐकून निंदकाच्या अंगाचा जळफळाट उडाला. सज्जनाच्या आचारांचा कित्ता गिरवून आपल्या अंगीं मोठेपणा आणण्याचे ज्यांना अवसान नसतें ते

लोक नेहमीं सज्जनाच्या निंदेनें आपला मोठेपणा वाढविण्याचा व्यर्थ खटाटोप करितात. याच नियमास अनुसरून गांवांतील दुर्जनांनीं जगमित्राचा नाश करण्याचा बेत ठरविला. नाना कुतर्क करून त्यांनीं जगमित्रावर अपशब्दांच्या लाखोल्या वाहण्यास सुरवात करून एके दिवशीं रात्रीं तो निद्रित असतां त्याच्या घराला लावून दिली. घरांमध्यें मुलेंबाळें निजलेली होती, तीं जळून आपलाही अंत होणार आणि भजनकर्मांत अंतर पडणार असें जाणून जगमित्र चिंताक्रांत झाला. बाहेर पळून जावे तर चोहोंबाजूंनीं अग्नि भडकलेला. अशा संकटसमयीं त्या भक्तानें निर्वाणीचा दाता जो पांडुरंग त्याच्या खेरीज कोणास हांका मारावयाची ? त्यानें करुणस्वरानें विठोबाचा मनोमय धावा केला. भक्तसंरक्षणार्थ हातामध्यें सुदर्शन धारण करून अक्षय्य उभा असलेल्या परमात्म्यानें तशा अग्नींतही जगमित्राचें रक्षण केलें. चमत्कार असा घडला कीं, चोहोंकडून अग्निप्रयल झाल्यामुळें सर्वगृह खाक झालेंच असेल असें वाटून दयाळू लोक निराश झाले.

त्यांच्या कल्पनेप्रमाण सकाळ होईपर्यंत अग्निनारायण आपलें काम करीतच होता. आगीच्या लोळांत अनाथ जगमित्र आपल्या कुटुंबासह भस्म झाला असें ऐकून गांवांतील लोक सकाळच्या प्रहरीं त्याठिकाणीं आले. तों तेथें घराचा वरचा तेवढाच भाग जळून गेला असून खालचा भाग सुरक्षित होता, असें त्यांच्या पाहण्यांत आलें. जळालेल्या भागाचे निखारे किंवा राख देखील खालीं पडली नसून सुरक्षित अशा खालच्या भागांत जगमित्र निर्भयचित्तानें भजन करीत आहेसें दिसतांच सर्व लोक आश्चर्यानें थक्क झाले. जगमित्र हा परमेश्वराचा प्रिय भक्त आहे अशी भावना जडून गांवांतील सुजनांनीं जगमित्रास कांहीं जमीन इनाम करून देण्याचा विचार ठरविला. विश्वकुटुंबी असा जो जगज्जीवन त्याच्या पदरचे आपण चाकर असल्यानें आपणास भिक्षेवांचून अन्य कशाचीच जरूर नाहीं असें कल्पून जगमित्रानें ग्रामवासीयांचें इनाम मनापासून नाकारिलें. जगमित्र विरक्त आहेसें पाहून ग्रामवासीयांनीं आग्रहानें एक चाहूर जमीन इनाम म्हणून त्याच्या नांवानें करून टाकिली. गांवांतील सर्व शेतकरी मिळून ती जमीन पिकवीत आणि जगमित्राच्या इच्छेनुसार सर्व उत्पन्न धर्मादाय करून टाकीत. असा क्रम चालू असतां तेथील अविंधजातीच्या हवलदारानें जगमित्राचें तें इनाम जप्त केलें. लोकांनीं हवलदाराची पुष्कळ विनवणी केली पण तो मुळींच ऐकेना. त्यानें जगमित्रास पुकारून असें सांगितलें " आमच्याघरीं आमच्या मुलीचें लग्न आहे. त्या कामीं आम्हांस पूजेकरितां व्याघ्र–देवता पाहिजे आहे. तूं जर जगमित्र आहेस तर आम्हांस एक जीवंत वाघ आणून दे. नाहीं तर आम्ही तुझें इनाम कायमचेंच जप्त करूं. " धर्मकृत्यांत हवलदाराची आलेली अडचण दूर करण्याकरितां जगमित्र अरण्यांत गेला. त्यानें तेथें पांडुरंगाला हाक मारिली. त्याची निर्वाणभक्ति पाहून पांडुरंग व्याघ्राचें रूप धारण करून त्याच्यापुढें येऊन उभे राहिले. जग-

मित्रास छळण्यास तयार झालेल्या हवलदारास फाडून खाण्याकरितां त्या व्याघ्ररूपी पांडुरंगानें जबरदस्त वांच्छा दर्शविली. तेव्हां हवलदार आपला प्रिय दोस्त असल्याबद्दल कळकळीनें सांगून जगमित्रानें देवास शांत केलें. नंतर जगमित्रानें वाघाच्या गळ्याभोंवतीं धोतर गुंडाळून त्यास गांवांत आणिलें. गांवाजवळ येतांच त्या व्याघ्रानें आपलें विक्राळ रूप प्रगट केलें. वाघाची हकीगत ऐकून बायकापोरें घरांत दडून बसलीं. जगमित्र त्या वाघाला हवलदाराच्या घरांत नेऊन सोडणार आहे असें ऐकतांच हवलदाराचीं मुलें माणसें दारें बंद करून बसली. तो पंचानन मोठाल्या गर्जना करूं लागला. त्याच्या भयंकर आरोळ्यांनीं घरेंदारें उलथून पडूं लागलीं. सर्व लोक हवादील झाले. सहस्त्रार्जुनानें रेणुकेचा छळ करून जसें सर्व क्षत्रियांवर संकट ओढवून घेतलें त्याप्रमाणेंच त्या हवलदाराच्या कृत्यानें गांवावर संकट ओढवून घेतलें असें जाणून सर्व गांव हवलदारावर दांत ओंठ चावूं लागला. हवालदाराच्या दारावर व्याघ्रानें आरोळी मारतांच त्याचें धाबें दणाणलें. हवालदाराचीं मुलेंमाणसें आपला जीव बचावण्याकरितां त्या हवालदाराला वाघाच्या तोंडांत देण्यास तयार होऊन त्याला घराच्या बाहेर ढकलूं लागलीं. तो दार उघडीत नाहींसें पाहून जगमित्र बोलला "हवालदारसाहेब! असें घाबरूं नका. आपणाकरिता मी दैवत घेऊन आलों आहे. तुम्हांस हें दैवत घोर वाटतें पण हा तुमचा भ्रम आहे. हें दैवत चंद्रापेक्षांही शीतळ आहे. तुम्ही निश्शंक बाहेर या." यावर त्या हवालदारानें आंतूनच जगमित्राची विनंति केली, तो त्याची क्षमा मागून सांगूं लागला "जगमित्रा; मी तुला शरण आहे. तूं माझा अन्याय क्षमा करून मला जीवदान दे. तूं खरोखरीच जगमित्र आहेस याबद्दल मला प्रचीति आली. आतां कृपा करून तूं तो व्याघ्र घेऊन परत जा. मी घोर पापी आहे. मी सर्वस्वी तुझा सेवक आहे."

हवालदाराची ही दीनवाणी श्रवण करून जगमित्र त्या वाघासह परत वनामध्यें गेला. तेथें भगवंतांनीं व्याघ्ररूपाचा त्याग करून जगमित्राला प्रत्यक्ष दर्शन देऊन कृतार्थ केलें.



# श्रीसाईबाबांच्या शिकवणीचें रहस्य

*****************************

श्रीसाईबाबांच्या जविन-तत्त्वांतील तीन महान् तत्त्वें प्रत्येकानें आपल्या दृष्टी-समोर प्रत्यहीं ठेऊन त्यांचें आचरण शक्य त्या परीनें आपल्या व इतरांच्या जीवनांत कसें घडेल यासाठीं झटणें हें प्रत्येकाचें पवित्र कर्तव्य आहे.

समन्वय, सर्वांभूतीं समता व ऐक्य. श्रीसाईबाबांच्या शिकवणुकींतील हें एक तत्त्व किती बहुमोलाचें आहे हें का स्पष्टीकरण करून सांगितलें पाहिजे ? मनुष्य कोणत्याही जातीचा, कोणत्याही समाजाचा, कोणत्याही धर्मांचा व देशाचा असो, तो मानव आहे. मानव हा येथून तेथून एकच. सर्वांतर्यामीं वास्तव्य करणारा परमात्मा भिन्न का आहे ? श्रीसाईबाबांकडे जे जे कोणी नानाहेतूंनीं व नाना कारणांनीं आले; त्यांच्याकडे त्यांनीं भेदभावाच्या दृष्टीनें केव्हांही पाहिलें नाहीं. सुष्ट असो, दुष्ट असो; पापी असो पुण्यवान् असो; हिंदु असो मुसलमान असो किंवा ख्रिश्चन वा यहुदी असो, जो कोणी येईल त्याचें कल्याण करावयाचें, हेंच त्यांचें ध्येय होतें. कोणी श्रद्धेनें येत; कोणी भक्तिभावानें येत तर कोणी उपहासाच्या किंवा चेष्टेच्या हेतूनें येत; परंतु त्यांची सर्वांकडे पहाण्याची दृष्टि प्रेमाची, ममत्वाची व त्याचें कल्याण साधणारी होती. चेष्टेच्या किंवा उपहासाच्या दृष्टीनें येणाऱ्यांकडे त्यांनीं कधीं वक्रदृष्टीनें पाहिलें नाहीं तर त्यांच्या अंतरंगांत शिरून त्यांच्या हृदयांत त्यांना कल्याणप्रद असा त्यांनीं थारेपालट घडवून आणिला.

आजही त्यांच्यामागें असा एक विवक्षित लोकांचा वर्ग आहे- व तो सर्वकाळीं असतोच कीं जो त्यांची निंद करण्यांत, त्यांच्या तत्वांना विकृत स्वरूप देऊन त्याचे भलते अर्थ लावण्यांत स्वतःला धन्य समजतो ! अशा लोकांबद्दल कोणालाही राग येण्याचें किंवा त्या तशा लोकांबद्दल दुष्ट विचार मनांत येण्याचें कांहींच कारण नाहीं. व्यक्ति तितक्या प्रकृति ! भिन्न विचारप्रणालीचे लोक समाजांत वावरत असावयचे व ते आपापल्या जवळच्या विचारांच्या मांडवलाच्या आधारें भिन्न प्रकारचे विचार समाजात पसरविण्याच्या उद्योगांत असावयाचेच !

आम्हीं आमचें मन विचलीत होऊं देतां कामा नये. जी निष्ठा एकदां विचार-पूर्वक स्वीकारली तिला खंबीरतेनें चिकटून राहिलें पाहिजे. प्रत्येक मनुष्यानें आपल्या जीवनांत वाईटांतून चांगलें असेल तें स्वीकारून त्याचें आचरण करण्याकडें आपलें लक्ष पुरविलें तर या जगांतील कितीतरी दुःख व विषारीपणा कमी होईल ! आम्हांला समन्वय साधतां आला पाहिजे, जगांत विकृती, दुष्टपणा, मत्सर, आपपरभाव,

द्वेषभावना यांचा बुजबुजाट पुष्कळ झालेला आहे. आम्हीं त्यांतच डुबत रहाण्यांत सुखसमाधान मानतां कामा नये. हे सर्व सभोंवार चालू असलें तरी त्याच्या आहारी यत्किंचिनही न जातां किंवा त्या प्रवाहाबरोबर वहात जाऊन त्या प्रवृत्तींच्या आहारीं न जातां कमलदलाप्रमाणें सभोवार चिखल असतांही स्वतः निर्लेप रहायला शिकलें पाहिजे व जें जें चांगलें, शुभ व कल्याणदायक दिसेल तेंच निवडून घेण्यासाठी सदैव झटलें पाहिजे.

श्रीसाईबाबा हे अवतारी पुरुष होते. त्यानीं जीवनांत समन्वय कसा साधावा, सर्वत्र 'आत्मौपम्येन' कसें पहावें, सर्वांच्या सुखांत सहभागी कसें व्हावें व सर्वांना सुखी करण्यासाठीं कसें झटावें, हें जीवनभर परोपरीनें प्रगट केलें आहे.

ती समता, तो समन्वय ती करुणा व ती लोककल्याणेच्छा हृदयाशीं बाळगून स्वतःला सदैव त्या प्रकाशांत ठेवण्याचा प्रयत्न करणें म्हणजेच श्रीसाईबाबांची भक्ति करणें होय.

## देवाच्या दरबारांत सर्व सारखे

हरीभक्त. मग तो कोणत्याही जातीचा, वर्णाचा वा धर्माचा असेना का. त्याची जात एकच. अशा प्रकारचें विश्वबंधुत्व त्यांनीं आचरिले व शिकविलें.

**तरी जो सर्वदा हरीस शरण । त्या काय म्हणावें हिंदु वा यवन । असो शूद्र, अतिशुद्र यातिविहीन । जाती न प्रमाण अनुमात्र ॥ नाहीं जयास देहाभिमान । असो हिंदु वा मुसलमान । सकल वर्णां समसमान । तया न भिन्नपण जातींचें ॥**

बाबांची ही शिकवण किती उज्वल व उच्च कोटीची आहे बरें ? हिंदु वा मुसलमान या दोन समाजांतील लोकांत भारी हाडवैर तें असूं नये. या उभय धर्मियांनीं समन्वय साधावा. एकमेकांशीं गुण्यागोविंदानें व प्रेमभावानें नांदावें म्हणूनच जणूं काय साईबाबांचा अवतार होता. समन्वय व हें ऐक्य दाखवून देण्यासाठीं त्यांनीं जीवनभर जंग जंग पछाडलें, आपण हिंदु कीं मुसलमान याचा कुणालाही कधीं थांगपत्ता लागून दिला नाहीं ! कारण ? मी हिंदु असलों काय मुसलमान असलों काय; देवाच्या दरबारांत मी सारखाच आहे. आणि प्रत्येक मनुष्य तेथें सारखाच आहे. मग तो कोणत्याही धर्माचा वा पंथाचा असो. असें असतां आम्ही या जगांतील मानवांनी निरनिराळे धर्म व पंथ कल्पून आपापसांत भेदाच्या भिंती उभाराव्या व भांडणें लढवत आयुष्याचा अपव्यय करावा हें किती अनुचीत व लांछनास्पद आहे बरें ?

परंतु जीवनांत अमृताची अवीट गोडी निर्माण करणारा त्यांचा हा एकात्मभावाचा जीवनसंदेश आम्ही झेलूं शकलों नाहीं आणि त्यामुळें आम्हीं आमच्यावर नाना संकटें व अरिष्टें ओढवून घेतलीं व अजूनही घेत आहोंत. महात्मा गांधीही

ह्याच जीवनसंदेश देण्यासाठीं आमच्यांत अवतीर्ण झाले; आपल्या प्रभावी वाणीनें वा वा वागणुकीनें त्यांनीं ह्याच संदेश भारतीयांस दिला. आणि तो जीवनसंदेश देतां देतां शेवटीं त्यानेंच त्यांच्या जीवनाचा अन्त घडवून आणिला !

यावरून भेदभावाचा, व एकमेकांत द्वेषभावाच्या भिंती उभारून आम्हांला एकमेकांपासून दूर दूर ठेवणाऱ्या विषारी वागणुकीचा पगडा आमच्या मनावर किती वज्रलेप झालेला आहे हें दिसून येईल.

कबिरापासून तों साईबाबापर्यंत किंवा महात्मा गांधीच्या वधापर्यंतचा काळ तपासून पाहिला असतां या भेदभावाच्या तत्त्वाची परंपरा कमी अधीक प्रमाणांत अखंड चालत आलेली आहे ही वस्तुस्थिती आहे; मात्र ती चालू रहाणें, तिचें पोषण करणें किंवा ती वृत्ती नष्ट व्हावी म्हणून न झटणें हें आत्मघातकी धोरण आहे. दैवी व सैतानी शक्तींचा हा झगडा अव्याहत चालू आहे; तो चालू आहे म्हणून तो इष्ट म्हणतां येणार नाहीं. तो नष्ट व्हावा, त्याचा जोर कमी व्हावा यतदर्थं झटणें यांतच दैवीपणा आहे. त्यांतच पुरुषार्थ आहे. कबीर, श्रीसाईबाबा यांच्यासारखे थोर संत किंवा म. गांधींसारखे महात्मे मधून मधून आमच्यांत अवतीर्ण होतात व त्या कार्यांसाठीं प्राण पणास लावूनही झटतात ते कशासाठीं ? त्या दिव्यत्वाची आम्हांला जाणीव व्हावी, व तें दिव्यत्व आम्हीं अंगीं बाणवून घ्यावें म्हणूनच आतां त्या दिव्यत्वाचा लाभ घडावा यासाठीं अजून तरी डोळे उघडून आम्हीं काय करीत आहोंत व आम्हीं काय केलें पाहिजे याचा गंभीरपणें विचार ज्याचा त्यानें केला पाहिजे.

## सारें जीवन धर्मैक्यानें व्यापलेलें

श्रीसाईबाबांच्या शिकवणुकीशीं ज्यांचा संबंध जडला त्यांच्या चटकन् लक्षांत भरणारी दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनीं कधींही धर्मांतराचा धडा दिला नाहीं तर नेहमीं धर्मैक्याचीच शिकवण ते प्रत्येकाच्या मनावर बिंबवीत गेले. त्यांनीं त्यासाठीं सर्वधर्मपरिषद भरविण्याची भानगड किंवा तशा प्रकारची कोणतीही उठाठेव केली नाहीं. त्यांचें सारें जीवन हेंच मुळीं धर्मैक्याचें साधन होतें. सर्व धर्मांचें—मग तो कोणताही धर्म असो—एकमेव साध्य म्हणजे ईश्वराची प्राप्ती. तो ईश्वर एकमेव सर्वव्यापी आहे. त्याच्याकडे कोणत्याही धर्माच्या साधन मार्गानें जा. विविध धर्म हीं त्या एकमेव भगवंताकडे घेऊन जाणारीं विविध साधनें आहेत. त्यांपैकीं कोणत्याही साधनाच्या सहाय्यानें तो सोपान साधतां येतो. मग धर्मांच्या त्या साधनाच्या उच्चनीचतेसंबंधीं वाद कशाला ? हा वाद घालीत बसणें म्हणजे निव्वळ वेडेचार आहे ! धर्मवेड म्हणतात तें यालाच ! तुम्हीं धर्मलंड होऊं नका व धर्मवेडे होऊं नका सत्धर्मांचे आचारी म्हणजे आचरण करणारे व्हा. सत्धर्माचें लक्षण ओळखा. एकमेकांचे वाभाडे काढणें, एकमेकांचा कमीपणा दाखविणें, दुसऱ्याचा धर्म हीन समजून आपणास अज्ञानामुळें वाटणाऱ्या आपल्याच श्रेष्ठ धर्माचा प्रचार किंवा त्यासाठीं बळजबरीही

# ‘ सुख पहातां जवापाडें ’–

ह्या जगामध्यें अन्याय, असत्य, हेवा, मत्सर, पाप इत्यादि ज्याप्रमाणें आहेत त्याचप्रमाणें दुःखहि आहे. सुख-दुःखातित स्थितीप्रत जाऊन पोहोंचलेले कांहीं तत्त्वज्ञानी बाजूस ठेविले असतां ही गोष्ट सर्वांना मान्य आहे. परमेश्वरावर ज्यांची श्रद्धा आहे असे लोक जेव्हां बुद्धीच्या सहाय्यानें आपली निष्ठा स्थिरावण्याचा प्रयत्न करितात तेव्हां त्यांच्या ठिकाणीं असणाऱ्या गुणांविषयीं अनेक प्रसंगीं संदेह उत्पन्न होतो. परमेश्वर कांहीं ठराविक नियमांन्वयें जर ह्या विश्वाचे व्यापार चालवितो असें धरून

---

करणें, हा काय धार्मिकपणा का सत्धर्म झाला ? आणि अजूनहि या सुधारलेल्या काळांत आपण काय बरें पहात आहोंत ? हा विपरीत व हानिकारक प्रकार त्यांना बिलकूल संमत नव्हता. तुम्हीं तुमच्या धर्माचारानुसार वागा. तुमचे आचार तुम्हीं सोडूं नका परंतु त्याकडे नवदृष्टीनें पहा. त्यांत सेवाभावाचें व बंधुभावाचें नवचैतन्य येऊं द्या. काय केले म्हणजे धर्म होतो व कसें वागलें म्हणजे होतो याचें संशोधन करा व त्याप्रमाणें वागा. इमानेइतबारें आपली रोजची कर्तव्यें पार पाडा. जीवत सेवाभावी व परोपकारी बनवा. या उच्च तत्त्वांची कास धरण्याचें सोडून तुझा धर्म श्रेष्ठ कीं माझा धर्म श्रेष्ठ ही वृथा काथ्याकूट कशाला करतां ? हेंच त्यांचें नेहमीं सांगणें असे. ते कुणाच्याही धर्मसमजुतीआड कधीं आले नाहींत किंवा त्या समजुतीकडे त्यांनीं कधीं हीन दृष्टीनें पाहिलें नाहीं. तुम्हीं माझ्यावर श्रद्धा ठेवा परंतु तुमच्या पूर्वश्रद्धेकडे पाठ फिरवूं नका किंवा ती कमी लेखूं नका, असें ते परोपरीनें जाणवीत असत. तुमचे जे कांहीं धार्मिक विधि किंवा नित्यनेम असतील त्यांत अंतर पडूं देऊं नका. ज्या बाजूला, ज्या ग्रंथाकडे, ज्या पुण्यपुरुषाकडे तुमचा ओढा असेल तो मागें खेचून घेऊं नका. तोच नव्या प्रकाशांत पुढें चालू ठेवा ही त्यांची महत्त्वाची शिकवण असे.

**कोणास आध्यात्म रामायण । कोणास ज्ञानेश्वरी पुरश्चरण । कोणास हरिवरदा पारायण । गुरु चरित्रावलोकन कोणातें ॥ कोण बसविती पाया जवळी । कोणास खंडोबाचे देऊळीं । कोणाच्या विष्णु सहस्र नामावली । बांधिती गळीं कळकळीनें ॥** इतका उदारमतवादी, व्यापक व सर्वपोषक त्यांचा दृष्टिकोन होता. त्यांच्या शिकवणुकीचें महत्त्व सांगावें तेवढें थोडेंच आहे.

चाललें तर मग प्रार्थनेला अवकाश कोठें राहतो ? परमेश्वर जर अपापविद्ध आहे तर जगांत पाप कसें आलें ? परमेश्वर जर प्रेमस्वरूप आहे तर तो आपल्या बालकांना दुःख सहन करावयास लावतो ? ह्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरें मिळणें बरेंच कठीण जातें. आज आपण दुःखाविषयीं थोडासा विचार करूं या.

"**सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वता एवढें**" ही संतोक्ति आहे. सुखाची स्थिति साहजिकच झाली असल्यामुळें साधारण जन तिच्याविषयीं विचार करीत नाहीं व दुःख झालें म्हणजे त्याची तीव्रता विशेष भासते. त्यामुळें दुःख पर्वताएवढें वाटतें. हिंदुधर्माच्या दृष्टीनें मनुष्याला होणारें सुख किंवा दुःख हें पूर्वसंचितावर अवलंबून आहे. परंतु हें केल्यास मनुष्याचें कर्मस्वातंत्र्य नष्ट होऊन कृत्याची जबाबदारी त्याच्यावर रहात नाहीं. शिवाय पूर्वजन्मामध्यें केलेल्या कर्मांचे फळ केव्हांतरी न समजतां भोगावयास लावण्यांत परमेश्वराच्या न्यायी स्वरूपाला गौणत्व प्राप्त होतें. एकनाथ महाराज सुखदुःखाची व्याख्या खालीलप्रमाणें करतात:—

सुख आणि महादुःख, दोन्हीं ते ग्रासोनियां देख प्रगटे स्वानंद स्वाभाविक, या नांव सुख उद्धवा ॥ जेथ दुजियाची चाड नाहीं, इंद्रियाचा पांग न पडे कांहीं; विषयाविण आनंद हृदयीं, **निजसुख** पाहीं या नांव ॥ विसरूनि हें निजसुख, कामापेक्षां करणें देखः याची नाम गा **परम दुःख**, केवळ मूर्ख ते सेविती ॥

साधारण जनतेनें ह्या सुख-दुःखाच्या व्याख्यांच्या योगें समाधान होणें अशक्य आहे. खिस्तीधर्मामध्यें असें सांगितलें आहे कीं परमेश्वर ज्यावर प्रेम करतो त्यालाच तो यातना भोगावयास लावतो. म्हणजे दुःख देणें हे प्रेमाचें लक्षण आहे कीं काय असें जर मानावें तर मनुष्याचें दोन प्रकारचें वर्गीकरण होते. एक वर्ग ज्यांवर परमेश्वर प्रेम करतो, ज्यांना दुःखाची स्थिति प्राप्त करून देतो अशांचा व दुसरा वर्ग परमेश्वराच्या प्रेमाला मुकलेल्यांचा, पण आनंदांत असणाऱ्यांचा. खिस्तानें एके ठिकाणीं म्हटलें आहे, परमेश्वर-पिता पाप्यावर व पुण्यवानांवर सारखाच पाऊस पाडतो व न्यायानें वर्तणाऱ्यांवर व अन्यायाने वागणाऱ्यांवर सारखाच पाऊस पाडतो. हें म्हणणें मनुष्याच्या द्विवर्गीकरणापाशीं विसंगत आहे. ज्ञानेश्वरानें ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायांत अनेक उदाहरणें देऊन देव सर्वांना कसें सारखे वागावितो हें स्पष्ट करून दाखविलें व्यावहारिक दृष्टीनें ह्या प्रश्नाचा विचार केला असतां दुःख देणें ही प्रेमाची खूण नव्हे हें सहज कळून येण्यासारखें आहे. एकाद्या कुटुंबाचा पोशिंदा आजारी पडला तर परमेश्वराचें त्यावर प्रेम म्हणून तो आजारी झाला असें समजावयाचें कीं काय ? त्याच्या आजारामुळें त्याच्या पत्नीला लागून रहाणारी काळजी हें परमेश्वराच्या तिच्यावरील प्रेमाचें द्योतक कीं काय ? बाप आजारी आहे व आई काळजीनें होरपळत आहे व त्यामुळें मुलांची आबाळ होते आहे हें परमेश्वराच्या मुलांवरील प्रेमाचें लक्षण कीं काय ? अशीं अनेक उदाहरणें घेऊन त्या विचारसरणीचा फोलपणा दाखवितां येईल. पॉंपे शहर एकदम तप्त रसांत गडप होऊन हजारों मनुष्यें एकदम मरण पावलीं,

जपानांत धरणीकंपानें लाखों माणसें एकसमयावच्छेदेंकरून मृत्युमुखीं पडलीं, इन्फ्ल्युएन्झानें लक्षावधि माणसें अल्प काळांत प्राणास मुकलीं, ह्या सर्व गोष्टी परमेश्वराच्या प्रेमाच्या द्योतक खास नव्हेत. तेव्हां ज्यांवर परमेश्वराचें प्रेम त्यांना तो दुःख किंवा यातना सोसावयास लावतो हें खरें नव्हे. आमची कसोटी पहाण्यासाठीं आमच्यावर दुःखें येतात असें मानलें तर ह्या प्रश्नाचा उलगडा होतो काय? अशा समजानें एक प्रकारचें समाधान प्राप्त होतें हें खरें, पण त्यामुळें दुःखमीमांसा होत नाहीं. टांकीचे घाव सहन केल्याशिवाय देवकळा येत नाहीं, ह्या म्हणीप्रमाणें दुःखानें धर्मबल वाढतें किंवा धर्मजीवनाचा विकास होतो असा अनुभव नेहमींच प्राप्त होत नाहीं. होत असेल तरी अशा प्रकारचा इष्ट परिणाम घडवून आणण्यास फारच मोठी किंमत द्यावी लागते असें म्हणावें लागेल.

येथपर्यंत दुःखासंबंधीं हिंदु व ख्रिस्ती धर्मकल्पनांचा विचार केला. पण त्यामुळें मनाचे समाधान होत नाहीं. वास्तविक पाहिलें असतां परमेश्वर मनुष्यांना यातना भोगावयास लावतो असे मानणेंच चुकीचें आहे. परमेश्वराने जेव्हां ही सृष्टि निर्माण केली, तेव्हां तिच्यावर मनुष्यप्राणी नव्हता. पृथ्वी निर्मिल्यापासून वादळें, धरणीकंप, महापूर इत्यादि प्रकार चालू आहेत. ते मनुष्यासाठीं परमेश्वरानें निर्माण केलेले नाहींत. कारण मनुष्यप्राणी हा मागाहून उत्पन्न झालेला आहे. इतर प्राणी व मनुष्य ह्यांत हा भेद आहे कीं त्याच्या ठिकाणीं आध्यात्मिकता आहे व इतर प्राण्यापेक्षां त्याचें बुद्धिबल श्रेष्ठ दर्जाचे आहे. ह्या बुद्धीच्या योगें परमेश्वराच्या सृष्टिविषयक नियमांचें ज्ञान करून घेणें मनुष्याला शक्य आहे. हें ज्ञान दिवसानुदिवस वाढत्या प्रमाणावर असून मनुष्यानें त्याच्या द्वारें अनेक अरिष्टांवर जय मिळविलेला आहे. म्हणून आपलें ज्ञान असेंच वाढवून आपल्यावर येणाऱ्या आपत्ती टाळण्यास मनुष्यानें शिकलें पाहिजे. अशा रीतीनें आपणांला प्राप्त होणाऱ्या दुःखाबद्दलची जबाबदारी देवावर न टाकतां मनुष्य जर ज्ञानवृद्धि करून दुःखाचें मूळ ज्या आपत्ती त्या टाळील तर जगांतील बरेंच दुःख कमी होईल व आरंभीं दिलेली संतोक्ति बदलावी लागेल. ह्या प्रश्नाचा नुसती अंधश्रद्धा किंवा नुसतें ज्ञान ह्यांच्या योगें योग्य उलगडा होत नाहीं; तर श्रद्धा व ज्ञान ह्यांचा मिलाप झाला पाहिजे. ह्यासाठीं ऋषींनीं केलेली प्रार्थना 'तमसो मा ज्योतिर्गमय' ही अधिक उत्कंठेनें व अधिक निष्ठेनें आपण करण्यास शिकलें पाहिजे. ज्ञानवृद्धीनें ज्याप्रमाणें प्रार्थनाक्षेत्र आकुंचित होतें तसें दुःखक्षेत्रहि आकुंचित झाल्याशिवाय रहाणार नाहीं.




( जून १९५६ )

या माहिन्यांत भक्तांची गर्दी नेहमींप्रमाणें होती. कांहीं कलाकारांनीं श्रींचे पुढें हजेरी दिली. ती खालीलप्रमाणें:-

**कीर्तन**

श्री. ह. भ. प. लक्ष्मण हणमंतराव चिरके. मु. बरमपूर जि. बीड ( म. वा. ) श्री. ह. भ. प. रामचंद्र गणेश ढेपे मु. जेऊर ( बायजाबाईचे ) अ–नगर श्री. ह. भ. प. छगनराव मारुतराव वारटके पंढरपूर. संस्थान गवई मराठे यांचीं कीर्तनें नेहमीं-प्रमाणें झालीं.

**तबलावादन**

श्री. मुरली महाराज. व व्ही. शांताराम. राजकमल कलामंदिर लालबाग परेल मुंबई

**गायन**

श्री. अप्पासाहेब इनामदार ( कला संगम पार्टी पुणे. ) श्री. त्रिंबक काशिनाथ जोशी. पोंदेवाडा चिजवेरोड नगर.

**लोकनाट्य**

श्री. पापादेवीबें गळूरकर प्रो. गुलाबराव हवालदार मुंबई.

**मोठ्यांच्या भेटी.**

चीफ जस्टीस माननिय चैनानी साहेब हायकोर्ट मुंबई ( महाराष्ट्रराज्य ) उभ-यता श्रींचे दर्शनास आले होते, मे. माननीय व्ही. आर. टळाशीकर डि. सेशनजज साहेब अहमदनगर मे. एन. एम. कामटे साहेब रिटायर्ड आय. जी. पी. मुंबई. मे. माननीय सुधोळकर साहेब जज सुप्रीमकोर्ट दिल्ली.

**कांहीं नवीन सोयी—**

मे. सन्मनानीय कोर्ट रिसीव्हर पोतनीस साहेब यानी साई संस्थानांत अनेक सुधारणा केल्या. भक्तांना थंडपाणी पिण्याकरितां ( भक्तनिवास ) या इमारतीचे मुख्यबाजूस एक ( नळ ) बसविला; तसेंच मंदिरांतील सभामंडपासमोर

स्टेजजवळ ( वाटरकुलर ) थंडगार पाणी पिणेसाठीं बसविलें; तसेच शिर्डी मुख्य कार्यालय ऑफीस कचेरी खालील मंदिराचे उत्तर बाजूचे दोन खोल्यांत पाणी आणलें. संस्थानाचे चौकशी ऑफीस श्रीगुरुपादुकानिंबवृक्ष समोरील रूम नं. ४१ व रूम नं. ४२ मध्यें आणून भक्तांना बसण्यासाठीं पुढील बाजूस सोयकरून उत्तम तऱ्हेने चोकशी ऑफीस चालू केलेलें आहे. चौकशी ऑफीसात पूर्वीं भक्ताना बाहेर उघड्या-वर जागा मिळेपर्यंत थांबावे लागे; पण हल्लीं नवीन चौकशी ऑफीस भक्तांना बाहेर गांवाहून येथें आल्यानंतर निवाऱ्यांत बसण्याची सोय बांक टाकून उत्तम करणेत आलेली आहे. तसेंच मुख्य कार्यालय ऑफीस सुंदर रंग वगैरे देवून सुशोभित केलेलें आहे. हें पाहून भक्तांना समाधान होईल.

शिर्डीची हवापाणी उत्तम. पावसाळा सुरू झाला. पण पाऊस कमी प्रमाणांत आहे.

---

# व्यथा

व्यथा जिवाची सांगायाला ।
आलों तव दारीं ।
नाथ, हो, ! लोटूं नका मज दुरी ॥ धृ ॥
पाप, ताप भय आम्हां जाळी ।
प्रेमानें घ्या बाबा जवळी ।
तुम्हांविण कोणी न संसारीं ॥ १ ॥
जीवन अमुचें जातें वांया ।
मार्ग दाखवी साईसदया ।
चुकलों आम्हीं भव अंधारी ॥ २ ॥
सांगू आम्हीं अभिमानानें ।
कधीं न राखी अम्हाला उणें ।
पिता आमुचा शिरडीचा श्रीहरी ॥ ३ ॥

—बा. भा. मगदूम



# पाईक

पाईक आम्ही साईंचे ।
नमवूं काळाला ॥ १ ॥
धुनीत जाळून जीवन अमुचे ।
जिंकूं देवाला ॥ २ ॥
संकटासवें झुंज घेऊनि–
राखू श्रद्धेला ॥ ३ ॥
अमर आमुची अभंग भक्ति ।
दावूं जगताला ॥ ४ ॥
शरणागत जो जगि बाबांचा ।
कधीं न वाया गेला ॥ ५ ॥
निर्धारानें प्राणपणानें—
जागूं वचनाला–॥ ६ ॥
पाईक आम्ही साईंचे ।
नमवूं काळाला ॥ ७ ॥

—बा. भा. मगदूम



## कै. गो. वि. क्षीरसागर

आम्हांस कळविण्यास अत्यंत खेद होत आहे कीं, संस्थानचे माजी ' कोर्ट रिसीव्हर साहेब ' श्री. गोपाळ विनायक क्षीरसागर यांस दीर्घ आजारानंतर अहमदनगर येथें त्यांचे घरी दिनांक १९।७।६५ रोजीं देवाज्ञा झाली. संस्थानचा कारभार त्यांनीं फार दक्षतेनें २ । २॥ वर्षें केला. व संस्थानांत अनेक सुधारणा घडवून आणल्या. याबद्दल संस्थान त्यांचे ऋणी आहे. श्री साईनाथ त्यांचे आत्म्यास शांती देवो.

## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३-७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality** | | by Pradhan | १-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १-०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस-दिल्ली | २-५० |
| (१०) | साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (११) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (१२) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१४) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१५) | स्तवन-मंजरी | (मराठी) | श्री. दासगणू | ००-१३ |
| (१६) | श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नांवें) | | ००-०६ |
| (१७) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१८) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१९) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (२०) | **Spiritual Symphony** | | by R. S. Harshid Mehta | २-५० |
| (२१) | **Side lights on Sai Baba** | (Eng.) | Calcutta | ००-७५ |
| (२२) | **Guide to Shirdi** | (English) | | ००-१२ |
| (२३) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००-२० |

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | **1-00** |
| (2) | ,, ,, ,, 9½" × 13½" medium | **00-37** |
| (3) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | **00-50** |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : बी. जी. पोतनीस, मुंबई १४.



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स

ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि

आणि त्याचप्रमाणें वैशिष्टयपूर्ण

सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

**५२४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई**

टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनी खास तयार केलेले श्री साईबाबांची तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक: शा. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक: बी. जी. पोतनीस, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड.